ईश्वरस्वरूप संतमहात्मे सर्वांना उपदेश करीत असतात.

" किंबहुना सर्वसुखी। पूर्ण होउनी तिन्ही लोकी
भजो जो आदिपुरुषी। अखंडित "

जेवढी सुखं म्हणून जगामध्ये आहेत ती सर्व मिळू देत. "जगातील सुखं सोडून द्या" असं सांगत नाहीत. सर्वही सुखं मिळावीत सर्वांना - पण ईश्वराचं अखंड स्मरण करावं हे त्यांनी सांगितलं आहे. प्रपंच आणि परमार्थ हा अत्यंत भिन्न आहे असं त्यांचं सांगणं नाही. संसार आधी करावा पण संसारामध्ये राहून "संसार हा देवाचा आहे". तुका म्हणे, देवाच्या चाली हा संसार व्हावा" "विठोबा संसाराचा भार वाहील" अशी संत महात्म्यांची बुध्दि आहे. <u>आमचा बुध्दिवाद आणि संतांचा बुध्दिवाद हा मात्र वेगवेगळा आहे.</u>
<u>ईश्वराचं अखंड स्मरण ठेवायचं आणि मग कार्य करायचं. प्रयत्न करायचा.</u> अर्जुनालासुध्दा भगवंतांनी हेच सांगितलं आहे. "कर्तव्यकर्म तुझे तू कर आणि कर्तव्यकर्म करीत असतांना स्वतःच कर्तृत्व आहे असा अहंकार ठेवू नकोस" एवढेच सांगितलं.

संसार किंवा मोक्ष बुध्दिमुळेच प्राप्त होतो. "संसार माझा आहे. सर्व कर्तृत्वशक्ती माझ्याकडं आहे. मी माझ्या बुध्दिच्या जोरावर सर्वही करू शकतो" असा अहंकार उत्पन्न होऊन आपण सर्व कर्तव्यकर्म करतो. आमचा प्रयत्नवाद असा आहे. संतांचा प्रयत्नवाद किंवा संतांचा बुध्दिवाद हा "<u>ईश्वराचं सर्व कर्तृत्व आहे. जन्माला घालणारा, रक्षण करणारा, नाश करणारा ही सर्वही शक्ती ईश्वराची आहे</u>" हे संतमहात्मे सांगतात. त्यांचा बुध्दिवाद हा आहे.

आपल्याला - संसारी जीवांना असं वाटतं, "सर्व विश्व उत्पन्न करणं किंवा त्याचा नाश करणं ही शक्ती कदाचित ईश्वराची आहे असं आपण मानू कारण हे आपल्याला शक्य आहे. पण रक्षण शक्ती <u>ही ईश्वराची कशाला मानायची</u>" ? इथे मतभेद आहे. रक्षण आमचं आम्ही करू शकतो की तिजोऱ्या आहेत. कड्याकुलपं आहेत. पहारेकरी आहेत. शस्त्रास्त्रं आहेत. आमच एकंदर सर्वही ज्या काही वस्तू म्हणा, अस्फोट म्हणा या सर्वांचं रक्षण करण्याचं सामर्थ्य आमचं का मानू नये ? पण संतांचं म्हणणं याच्या उलट आहे. <u>उत्पत्ति आणि नाश याच्याबरोबर रक्षणशक्तीही ईश्वराचीच आहे</u> आणि त्याकरिता युक्तिवादही त्यांनी मांडलेला आहे.

"सरविता रक्षितपोहि गर्भे", त्यांनी विचारलं "गर्भामध्ये रक्षण करणारा कोण आहे ? " आई रक्षण करू शकेल- गर्भातल्या मुलाचं ? माता ही मोठी

दैवत आहे. "मातृदेवो भव, पितृदेवो भव, आचार्यदेवो भव, अतिथिदेवो भव" शास्त्रकार सांगताहेत. आणि "मातृदेवो भव"- "न मातुः परदैवतम्" शास्त्रकार सांगताहेत. मातेपेक्षा श्रेष्ठ दैवत नाही. मातेचं प्रेम फार विलक्षण आहे. मातेसारखं प्रेम कोणालाही करता येणार नाही. स्वतःच्या सुखदुःखाकडे तिचं लक्ष नाही. मुलाचं संगोपन करणं, ओझं नाही. त्रासमूळ नाही. पण मुलगा जन्माला आल्यानंतरचं आहे ते गर्भामध्ये मूल असतांना त्याचं रक्षण माता कशी करू शकेल ? त्याची भावनाच सोय. अन्नरस मिळणं कोठीतरी पाहिजे की नको ? ते मातेला शक्य नाही. इथे जो रक्षण करणारा आहे तोच पुढे रक्षण करणार आहे. हे ते अनुभवानं सांगताहेत. युक्तिवाद हा त्यांचा आहे.

केवळ अंधश्रद्धा नाही. अंधश्रद्धेनं सगळं काम चालू आहे. असा सध्याचा बुद्धिवाद म्हणतो आहे. बुद्धी श्रद्धा ठेवून सगळी कितीतरी कामं करतो आहोत आमच्या हातून किती कार्य होतं आहे ? विचार केल्यानंतर आपल्या स्वतःबद्दल, स्वतःच्या कर्तृत्वाबद्दल अभिमान आम्हाला वाटतो तो योग्य आहे का ? हा विचार करायला पाहिजे. "स्वराज्य मिळाल्याशिवाय कोठे सुख मिळणार नाही" अशी पूर्वी विचारधारा होती. पारतंत्र्य म्हणजे दुःख आहे. हे खरं आहे, नाही असं नाही. परंतु स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सगळे ऐहिक सुख - पारमार्थिक बाजूला राहू द्या - त्याच्या अस्तित्वाबद्दलच सर्वांचं मन साशंक आहे, गेल्यानंतर सुख कुठलं मिळणार ? आहे तोपर्यंत सुख मिळा- पाहिजे याकरिता प्रयत्नवाद आहे. पण याही प्रयत्नवादाचं फळ आपल्याला किती मिळालं ? विचार करा. "स्वातंत्र्य मिळालं ही चूक झाली" असा याचा अर्थ तुम्ही घेऊ नका. स्वातंत्र्य पाहिजे. स्वातंत्र्य हे सुखाचं साधन आहे. म्हणू- न शिवाजी महाराजांनी त्याकरिता प्रयत्न केले आहेत. त्यावेळी आपण परतंत्रता त्यावेळेला एवढी नव्हती - बुद्धि स्वतंत्र होती. संस्कार, धर्मसंस्कार, भक्तीचे संस्कार हे सर्व त्यावेळेला होते. आताही आहेत. पण त्यामध्ये भेसळ झालेली आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपण सुखी होऊ शकतो. आपल्या बुद्धीनं आपण काम करून घेऊ. पण तसं होत नाही ? कित्येक प्रकारच्या चिं- ता पाठीमागे लागलेल्या आहेत. शत्रूची भीति आहे. परराष्ट्राची भीति आहे. साहाय्य करणाऱ्या लोकांनाही आपल्या स्वाधीन भारत राष्ट्र राहिलं पाहिजे असं वाटतं. आम्ही सांगू तसं वागलं तर आम्ही वाटेल तेवढं साहाय्य करू. अ- नेक प्रकार उत्पन्न झालेले आहेत. स्वातंत्र्याकरिता कितीतरी मोठमोठ्या लोकांनी बलिदान केलेलं आहे. मिळालं स्वातंत्र्य. परंतु सर्वांठिकाणी "सर्वेपि सुखिनः सन्तु" असं जे संतमहात्मे विचार करतात, प्रयत्न करतात. सर्वांना सुखी करण्याची शक्ति आमच्या बुद्धीमध्ये आहे काय ? हा प्रश्न आ-

कोणीही याचं उत्तर देऊ शकत नाही.

यावरून संतांनी जो कांही देखावा मार्ग -म्हणजे पूर्वापार आहे - शास्त्रवचनांना शास्त्र प्रमाण आहे. मोठं प्रमाण आहे. त्यांत कितीतरी प्रकारचे शोध आहेत. परकीय लोकांनी पुष्कळ संस्कृत ग्रंथ नेले. वेदपाठकांतून त्यांना ते मिळाले. अभ्यास त्यांचा चांगला आला, त्या वेळच्या पोथ्या-पुस्तके पेटयामध्ये बांधून ठेवून टाकली. म्हणून इंग्लंड, जर्मन लोक व आपले लोक म्हणाले, "वेद हा अडगळ आहे. शेवटीच घरातील अडगळ कमी होईल" म्हणून आम्ही देऊनही टाकली. त्याचा अभ्यास करून त्यांना कितीतरी शोध लागलेले आहेत. तर हे प्रमाण आहे. पण कितीतरी ज्ञान हे त्या वेदशास्त्रग्रंथामध्ये आपण करून घ्यावं आणि त्यामध्ये जे मार्गदर्शन केलेलं आहे त्याप्रमाणे वागून आपल्या बुद्धिचं तारतम्य ठेवून आपण सुखी व्हावं एवढंच त्या महात्म्यांना सांगायचं आहे. पूर्वीच्या ऋषीमुनींना एवढंच सांगायचं आहे. तुम्ही बुद्धिवाद सोडून द्या. एक आंधळा पुढे निघालेला आहे, त्याच्या काठीला धरून दुसरा आंधळा निघाला, रस्त्यातून चाललेले आहेत. पुढचा पडला की मागचा पडायचा. स्वतः आंधळा होते आहेत त्यांनी डोळ्यांनी पाहून जावं हेच बरं आहे. तरी बुद्धि हे सगळ्यांना दिलेलं साधन आहे. त्या बुद्धिचा उपयोग अवश्य केला पाहिजे असंही शास्त्रकारांचं मत आहे. पण ती बुद्धि सुधारून घेतली पाहिजे. संस्कृत बुद्धि पाहिजे. त्या बुद्धिमध्ये संस्कार करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

"संस्कार" याचा अर्थ - शंकराचार्य म्हणतात, दोष सगळे बाजूला करावे आणि त्या बुद्धिमध्ये गुणांचं संकलन करावे. गुण कोणते आणि दोष कोणते हेही समजून घेतलं पाहिजे. श्रेष्ठ लोकांना केलेले उपदेश त्याकरिता आहेत. कोणता दोष आहे, कोणता गुण आहे हे आपल्याला समजलं पाहिजे. नाहीतर प्रयत्न करण्याचा आपल्या बुद्धिला वाटेल त्या मार्गाने जायचं आणि शेवटी एकच चुकली म्हणायचं ते पानशेतचं धरण झालं ना. ते काय लोकांना सुख मिळू नये म्हणून झाल ? इच्छा चांगली आहे. लोकांना पाणी पुष्कळ मिळालं पाहिजे. शेताला धान्य मिळालं पाहिजे. चांगली इच्छा आहे. परंतु त्यामध्ये कोणता मार्ग पाहिजे हा विचार पूर्ण झाला नाही. एकदम उतावळेपणे ते बांधकाम होऊन गेलं. ते धरण फुटलं. पुष्कळ लोकांचं नुकसान झालं. घरं वाहून गेली. माणसं मेली.

आपली स्वतःची बुद्धि पाहिजे. कार्य बुद्धिनेच होणार. बुद्धि एकच आहे. बुद्धिशिवाय कोणतंही कार्य होणार नाही. हे सर्वांना मान्य आहे. आधुनिक बुद्धिवाद्यांनीही बुद्धि प्रशंसा केली असं नाही तर प्राचीन लोकांसाठी हे शास्त्र आहे. संतमहात्मे आहेत त्यांनीसुद्धा बुद्धिची प्रशंसा केली. परंतु ती बुद्धि स्थिर ते मन निर्दोष झालं पाहिजे. उत्तमगुणसंपन्न झालं पाहिजे एवढंच त्यांचं म्हणणं आहे

दुष्यन्त राजा वनामध्ये गेलेला आहे. कण्व ऋषींचा आश्रम आहे. आश्रमांत ऋषींच्या दर्शनाकरितां म्हणून गेला. ऋषी पुढे बाहेर गेलेले होते. शकुंतला - विश्वामित्रांची कन्या - तिचं संरक्षण लहानपणापासून कण्वांनी केलेलं होतं. शकुंतलेचं लावण्य पाहिल्याबरोबर त्याच्या मनांत विवाहाविषयी मोह उत्पन्न झाला. ही कोणाची कन्या असेल? हिच्याबरोबर जर माझा विवाह झाला तर मी सुखी होईन असं त्याला वाटलं. पुन्हा वाटले, "ऋषींची कन्या असली तर? हीची अभिलाषा आपण करणं बरं नाही." असा थोडासा विचार केला आणि त्याने आपल्या मनाचा आत्मविश्वासाने निर्णय केला.

"असंशयम् क्षत्र परिग्रह क्षमा, यदार्यम् अस्याम् अभिलाषि मे मनः"   मनानेच ठरविलं आहे. ही क्षत्रियकन्या क्षत्रियाशी लग्न करण्याला योग्य आहे. ती क्षत्रियाचीच मुलगी असली पाहिजे. स्वतः माझं आर्य मन आहे त्याच्या मनांत ही अभिलाषा उत्पन्न झाली त्याअर्थी ही या ऋषींची मुलगी नसून क्षत्रियाचीच मुलगी असली पाहिजे, ऋषींची मुलगी नाही. हा त्याच्या मनातून निर्णय घेतला. त्याने विचारले. "ही कोणाची कन्या आहे?" विश्वामित्र - मेनका अप्सरेची कन्या आहे.

म्हणजे आपले विचार बुद्धीने केलेला निर्णय बरोबर असू शकतो पण ते मन आर्य असलं पाहिजे. "इकडे लक्ष द्या" असं सांगताहेत. मनाला आर्य बनवा. संस्कारयुक्त बनवा. बुद्धीमधील सगळे दोष नाहीसे करा आणि त्या बुद्धीमध्ये उत्तम गुण आले पाहिजेत. श्रेष्ठ, उत्तम गुणसंपन्न बुद्धि झाली पाहिजे.
भगवद्गीतेमध्ये सगळं सत्पुरुषाचं वर्णन केलेलं आहे. दैवी संपत्ती आणि आसुरी संपत्ती ही त्यांनी पुढे मांडलेलीच आहे. हे सगळे गुण म्हणजे दैवी संपत्तीचे आहेत. निर्भयता - १६व्या अध्यायांत दैवी संपत्ती किंवा आसुरी प्रवृत्ति याचे वर्णन केलेले आहे. अभय, सत्त्वशुद्धि हे जे गुण सांगितलेले आहेत. अभय म्हणजे निर्भयता पाहिजे. मनामध्ये कार्य करीत असतांना हा श्रेष्ठ पुरुषांनी दाखविलेला हा योग्य मार्ग आहे. त्या मार्गाने आपण जावे मग कुणाची कुठलीं भीति बाळगायची नाही.

शिवाजी राजांनी जो विचार केला. सगळे मावळे जमवले आणि स्वतंत्र राज्य आपलं झालं पाहिजे, धर्मानुसार विचार करणारी बुद्धि जिच्यांत आहे असं राज्य झालं पाहिजे, म्हणून प्रयत्न सुरु केला. त्यांना त्यावेळी सहाय्यक मंडळी मिळालेली आहेत. त्यांची बुद्धिही आर्य आहे, निर्भयता आहे. सिंहगड पूर्वी त्याला कोंडाणा म्हणत असत. शिवाजीराजांकडून तानाजीला निरोप आलेला आहे. "उदय कोंडाणा किल्ला घ्यायचा आहे." तानाजी मालुसऱ्याच्या

कुमारीचं लग्न ठरलं होतं. त्यावेळेला शिवाजी राजांना "कुमारीच्या लग्नाला आपण यावं" असं आमंत्रण करण्याकरिता तो निघणार होता. त्यावेळेला राजांचा निरोप आला. लग्न रहित केलं. आधी हे [illegible] करायचं त्यानंतरच आता आहे. आणि आपल्याला स्वतंत्र आहे. शत्रूने किल्ला घेतलेला आहे. म्हणून धर्माचा विचार नाही. नातेसंबंधाचा कोणाही विचारसरणी त्यांच्या बुद्धिमध्ये नाही. म्हणून किल्ला घेण्याकरिता तानाजी लगेच निघाले. लढाईवर जायचे म्हणजे पुढे दिसला जायचे नाही. आधी कोणाची. पत्नी सर्व [illegible] करायची. कर्त्यावर्त्यांची व्यवस्था करायची. जायचं [illegible] काय नक्की अवस्था असते. लढाई म्हणजे काही [illegible] नाही. जिवंत राहू किंवा नाही याचा संशय आहे. अशा संदिग्ध परिस्थितीमध्ये देहाचीही पर्वा नाही. राष्ट्राचं काम आहे. आपल्या नेत्याची आज्ञापालन करण्याकरिता तानाजी गेले. देह अर्पण करून [illegible] त्यांनी गड घेतला. सिंहगड हे नांव दिलेलं आहे. "गड आला पण सिंह गेला" म्हणाले. अजूनही आपल्यासमोर अशी उदाहरणे आहेत. इतकी वर्षे झाली ३०० वर्षे झाली. पण त्यांचा जो त्याग आहे - देहाची कुठलीही पर्वा नाही. राष्ट्राकरता - म्हणजे सर्वांची समाजाकरिता. समाज सुखी झाला पाहिजे. म्हणून आपली बुद्धि त्यांनी अशी [illegible] होती. उपदेश करणारे [illegible] त्यांना भेटले होते. आणि त्यांनी उपदेश केला की भगवंताचं अधिष्ठान ठेवून तुम्ही कार्य करा. राष्ट्राचं कार्य तुम्ही करा. पण ईश्वराला विसरू नका. ईश्वराला विसरणं म्हणजे स्वतःच्या बुद्धिचा अभिमान धरून राहणं आहे. आणि मग त्यामध्ये कितीतरी चुका होतात. म्हणून ती चूक झाली म्हणजे [illegible] काय अर्थ आहे. त्यांत मोठेपणा नाही. आम्ही पुष्कळ वाचा [illegible] असे [illegible] कबूल करणे हा मोठेपणा नाही. हा दुसरी चूकही कबूल करतो. किती मोठा आहे हा दुसरी [illegible] चूक नंतर कबूल करून काय करायचं [illegible] लवकर [illegible] नाही झाल्यावर मग चूक कबूल करायची. पण ती चूक होऊ नये म्हणून ईश्वराचं स्मरण [illegible]. [illegible] त्यांचं सांगणं आहे. बुद्धिचं कार्य व्हायचं.

अर्जुनाची बुद्धि श्रीकृष्णांनी सुधारली [illegible]. "मी सांगतो तसं केल" असं म्हणाले आहेत. [illegible] हे शास्त्र [illegible] ती ईश्वराची बुद्धि आहे. काय करावं आणि काय करू नये याची सर्व व्यवस्था शास्त्रामध्ये करून ठेवलेली आहे. हे पाहून त्याप्रमाणे वागण्याचा निर्णय घे. आपल्या बुद्धिमध्ये असलेले सगळे दोष काढून टाक. गुरुसंपादन करून नंतर बुद्धिप्रमाणे तू वाग म्हणाले. अगोदर जर बुद्धिचा उपयोग आपण करायला लागलो तर आपल्या बुद्धिचा विश्वास नाही. बुद्धिमध्ये पूर्ण ज्ञान नाही. शक्तिही पूर्ण नाही. सर्व ठिकाणी अपूर्णता आहे. म्हणून मोठ्या मोठ्या ऋषींचे हलकं सांगणं आहे की समर्थ लोकांचा [illegible] आलेली आहे. "हे काय, आपणही जातात आणि इतरांनाही घेऊन जातात". [illegible] विचार करण्यासारखी गोष्ट आहे.

गोष्ट आहे.

दुसरी गोष्ट – आज जो वारकरीसंप्रदाय आहे – ७०० वर्षे कार्य चाललेलं आहे. पंढरपूरला जातात – आषाढी-कार्तिकी – दिंडी लाखून लोक येतात. नागपूर-विदर्भ सगळे लोक चालत जातात. हे ज्ञानोबांनी शिकविलेलं आहे. आपल्या राजकीय पुढाऱ्यांनी केलेलं मार्गदर्शन किती दिवस चालतं ? हे आपण विचार करून पहावं. कांही दिवस उत्साहाच्या भरांत, पुढारी-दादासाहेब विचार आपल्या मनांत जोपर्यंत आहे तोपर्यंत त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे वागतील, पण ज्ञानेश्वरमहाराजांनी, तुकारामांनी, एकनाथांनी मार्गदर्शन करून ठेवलेलं आहे की पंढरपूरला जाऊन या. कोणीतरी वारी तुम्ही घ्या पण वर्षांतून एक वेळ तरी पंढरपूरला जाऊन या. किती हाल असतात, कष्ट किती आहेत, अन्न नाही. पाऊस नाही, वारा नाही, कुठे जेवायला मिळालं तर मिळालं नाहीतरी नाही, हे जे त्यांच्या बुद्धिवान महात्म्यांनी संस्कार केलेले आहेत त्या संस्कारयुक्त बुद्धिनं ७०० वर्षं होऊन गेल्यावरसुद्धा कार्य चालू आहे, हे कोणाच्या आदेशाने चाललेलं आहे ? आता नवं हे पण संकल्प कोणाचा आहे ? शुद्ध संकल्प आहे, ज्यांची बुद्धि अत्यंत शुद्ध झालेली आहे, तो नेता राज्याला मिळाला पाहिजे. म्हणून वाल्मिकी महर्षींनी रामायण-रामचरित्र लिहिलं आहे. नेता कसा असला पाहिजे ? मार्गदर्शक नेता कसा पाहिजे ? हे दाखविण्याकरिता रामचरित्र लिहिलं.

ज्ञानदेवांचा संकल्प आहे की सर्वांनी पांडुरंगाचं दर्शन घेण्याकरिता जावं, तो संकल्प ७०० वर्षे चालू आहे, तिथे कांही राजदूतांचा बदलून नाही. बदलूनसुद्धा किती दिवस चालतो कुणास ठाऊक ? त्यालाही मर्यादा असतात, ही अशा प्रकारची संकल्पशक्ती – त्यांची जी बुद्धिशक्ती आहे, त्यांची बुद्धि इतकी योग्य आहे – हे या साध्या उदाहरणावरून पहायला मिळतं, वारकरी लोक इतके कष्ट करून कसे चालू शकतात ? परंपरा वर्षानुवर्षे चालू आहे, अशा प्रकारचं नेतृत्व पाहिजे असेल तर बुद्धि अशी पाहिजे.

"सर्वेऽपि सुखिनः सन्तु, सर्वे सन्तु निरामया" असं नुसतं म्हणून उपयोगी नाही.
सर्वे भद्राणि पश्यन्तु, मा कश्चित् दुःखमाप्नुयात्" अशी इच्छा संतांची आहे.
आम्ही ही प्रार्थना म्हणतो खरी पण स्वतःच्या आरोग्याकडे आमचं जास्त लक्ष आहे

वास्तविक सर्वांनी सुखी व्हावेत अशी मनाची धारणा करणे आणि त्यासाठी प्रयत्न करणे – या सर्वांमध्ये आपणही येत असतो. लोकांच्याकरता प्रयत्न करायचे असं नाही. सर्व सुखी व्हावेत म्हणून प्रयत्न करायचे या सर्वांमध्ये स्वतःचाही अंतर्भाव होत असतो. पण ते आपल्या मनांत येत नाही. मी जास्तीत जास्त सुखी झालं पाहिजे, मग बाकीच्या लोकांकडे लक्ष द्यावं, ही जी मनाची धारणा आहे ती रद्द व्हायला हवी. स्वार्थाकडे पहिले लक्ष आहे, आणि नंतर जगाकडे, हा नेता होऊ शकत ना[illegible] वाल्मिकींनी सर्वांनी रामाचं नेतृत्व सर्वसाधारण लोकांपुढे आणलेलं आहे. रामाची

पूजा करा. मारुतीची मंदिरे स्थापन करा. आम्हां जे कांही आहे ते सर्वापुढे मांडलेलं आहे. ते या करता आहे. त्याग केवळ आहे रामचंद्राचा. याकडे कोणाचे लक्ष नाही. त्याच्याबद्दल विचार न करता. त्या रामायणाचे पूर्ण अनुसंधान न ठेवता आज भारतामध्ये त्याच्याबद्दल अत्यंत वाईट विचार करणारे. लिहिणारे लोक भारतांत जन्माला आलेले आहेत. राज्यशासन तर अनिष्टच राहिलेलं आहे. आपलं राज्य धर्मातीत आहे असं सांगून ते मोकळे झाले आहेत. धर्मातीत शब्दाचा अर्थ काय आहे हे ते सांगू शकत नाहीत.

आता स्वातंत्र्य आहे. स्वातंत्र्य मिळाल्यामुळे बुद्धिने. वाणीने काय वाटेल ते करावे हा "स्वातंत्र्य" शब्दाचा अर्थ झालेला आहे. पण आज भारताने रामाच्याबद्दल, त्यांच्या भावना सर्व कांही समजून घेतलं पाहिजे. त्याचा पूर्ण विचार केला पाहिजे. राम हा परमेश्वराचा अवतार आहे. हा विचार बाजूला ठेवून हा एक राजा होऊन गेलेला आहे. एवढा विचार केला आहे/ हा विचार बाजूला असतानासुद्धा स्पष्ट त्याच्याबद्दल आपल्या मनांत आदर आहे म्हणून हे विचार येतात. त्यावेळी लोकांना नेतृत्व हे असं नेतृत्व मिळालं म्हणून वाल्मिकींनी सर्वां पुढे ठेवण्याचा प्रयत्न केला. रामांच्या त्याग किती विलक्षण आहे ? वनामध्ये जाण्याचा प्रसंग आला. दशरथ राजाला कांहीही बोलता येईना. वनामध्ये जातो म्हणाले - गेले. भरताला नंतर समजलं. दशरथ राजाचे प्राण गेल्यावर - नंतर भरत आलेला आहे. तेव्हां आपल्या आईमुळे हे झाले हे समजलं त्याबरोबर आईचा राग आला. आईला शिक्षा केली पाहिजे. मारलं पाहिजे. पण एकदम त्याच्या मनात विचार आला की मी जर आईला असा प्रकारे शासन केलं तर राम मात्र तोंडसुद्धा पाहणार नाहीत. हा विचार मनामध्ये आला आणि तो राग त्याला आवरावा लागला. नेता दूर आहे. अरण्यांत. हा अर्थ आहे. परंतु याच्या मनांत नियंत्रण करण्याची शक्ति त्या नेत्याजवळ आहे. हे त्यागाचे सामर्थ्य आहे. मनामध्ये. बुद्धिमध्ये जर गुण उत्पन्न झालेले असतील तर त्या गुणांनी संस्कृत झालेल्या बुद्धिचे सामर्थ्य आहे की त्या रामाच्या बुद्धिकडे पाहून भरताला स्वस्थ रहावं लागलं.

भरताचंही सुरेख वर्णन वाल्मिकींनी केलेलं आहे. त्याग गुणाचा श्रेष्ठ आहे.? चित्रकूट पर्वतावर सगळ्या अयोध्यावासी लोकांना घेऊन भरत अरण्यांत गेलेला आहे. रामाला परत आणण्याकरितां भेट झालेली आहे. तो म्हणाला. रामराया. परत चला. आपले राज्य ताब्यात घ्या. पण रामचंद्र म्हणाले. "नाही बाबा. मला येतां येत नाही. मला पित्याची आज्ञा पालन केली पाहिजे. तुलाही पित्याची आज्ञा पालन केली पाहिजे. मला १४ वर्षे वनवासांत रहाण्याची आज्ञा आहे. तुला राज्य करण्याची आज्ञा आहे. तू राज्य कर. ती आज्ञा रामचंद्रांनी सहजी

संकटांत पडलो. सुग्रीवाला राज्याभिषेक त्याच्या वेळेला वालीचा नाश केला. सुग्रीवाला राज्य दिलं. सुग्रीवाला राज्याभिषेक करण्याच्या वेळी त्याने रामचंद्रांना बोलावले. रामचंद्र म्हणाले, मला वनाची हद्द सोडून येता येणार नाही. लक्ष्मणाला बोलावून सांगितले, "तुम्ही जाऊन याला घेऊन जाऊन राज्याभिषेक करा. लंकेमध्ये गेले. रावणाचा नाश केला. राज्य सगळं त्याच्या भावाला दिलेलं आहे. लंकेमध्येसुद्धा पाऊल ठेवलं नाही. १४ वर्षे पर्यंत वनाची हद्द सोडायची नाही. केवढा निश्चय आहे

भरताचा त्याग त्याच्यापेक्षा मोठा आहे. त्याच्या आईनं त्याला राज्य मिळवून दिलेलं आहे. १४ वर्षे रामानं वनामध्ये जावं आणि भरतानं राज्य करावं. असं आईनं मागितल्यामुळे ते वर दशरथराजाला द्यावे लागले. पण आईनं राज्य मिळवून ठेवलेलं आहे. राम स्वतः सांगताहेत, तू राज्य कर. पण याचा निग्रह किती आहे. त्याग किती आहे त्याने रामाच्या पादुका मागून घेतलेल्या आहेत. बुद्धि बदलायला नको आहे. बुद्धीचा निश्चय कायम राहू शकत नाही. स्थिर बुद्धि व्हायला अनेक जन्म घ्यावे लागतात. स्थितप्रज्ञाची अत्यंत उच्च अवस्था - दुसऱ्या अवतारावर शेवटी सांगून ठेवली आहे. भगवंतांनी. मनामध्ये कोणत्याही वासना नाहीत. इच्छा नाही. स्वार्थ संपलेला आहे. आता उरलो उपकारापुरता. मला स्वतःला काहीच नकोय. तर ही अत्यंत मोठी अवस्था आहे. ही अवस्था प्राप्त होईपर्यंत बुद्धीचा नेम नाही. या बुद्धीने कार्य केली असतील पुष्कळ किंवा होतीलही पण ती केव्हां बदलेल याचा नेम नाही.

अर्जुनासारख्याची बुद्धि बदलली नाही. अरण्यात असताना १२ वर्षे - व्यासांनी येऊन अर्जुनाला सांगितले आहे. मंत्र दिलेला आहे. "तू जा. शंकराची उपासना कर. त्यांची कृपा संपादन कर. देवांची सर्व शस्त्रविद्या मिळवून ये. तुम्हाला पुढे राज्य घ्यायचंय." व्यासांनी मार्गदर्शन करून त्यांना पाठवलं. पाच वर्षे पर्यंत स्वर्ग लोकांमध्ये राहून देवांची सर्व शस्त्रविद्या घेतलेली आहे. अजिंक्य आहे. केवढी ईश्वरभक्ती त्याला होती. गुरु द्रोणाचार्यांची भक्ती होती. त्यांच्या कृपेने अत्यंत श्रेष्ठ अस्त्र तो शिकला. त्या विराट नगरीतून बाहेर पडणाऱ्या वेळेला आणि दुर्योधन एका बाजूनी हल्ला केला. पांडव इथे असतील असा त्यांना संशय आलेला आहे. पांडवांना एकदां अज्ञातवासातून बाहेर काढलं की पुन्हा १२ वर्षे वनवास पडेल. ही बुद्धि १२ वर्षे वनवास आणि एक वर्ष अज्ञातवास ही फार भयंकर गोष्ट आहे. पांडव हे असेच राहू शकणार नाहीत ही खात्री आहे - दुर्योधनाची म्हणजे श्रेष्ठ कोण ठरले. सगळं राज्य घेतलं, पांडवांनी मिळविलेलं होतं - राजसूय यज्ञ करून - सर्व राजांना जिंकलं होतं. पांडवांनी मिळविलेलं राज्य सहज केव्हां केव्हां घेतलं आणि पांडवांनी ते सर्व मानलं. आपण पणाला लावलेलं राज्य म्हणून वनामध्ये गेले. परत तिथेही त्यांच्या पाठोपाठ हेर आहेतच. वनात गेल्यापासून पांडव कुठे जातात. काय करतात. दुर्योधन

दुर्योधनानी सगळी योजना करून ठेवली होती. तेराव्या वर्षी ते कुठे जातील. त्यांना एकदा शोधून काढलं की पुन्हा १२ वर्षे वनवास म्हणजे अनायासे पांडवांनी वनवासांत राहिलं पाहिजे आणि त्यांचं राज्य आपल्या सत्तेखाली आपल्या हातात राहिलं पाहिजे ही दुर्योधनाची इच्छा आहे.

इकडे भरताचं चाललेलं आहे. रामचंद्रांनी जेव्हां सांगितले, "मी येणार नाही तुम्हाला राज्य केलं पाहिजे" तेव्हां भरताने रामाच्या पादुका मागून आणल्या. सिंहासनावर त्या पादुकांची स्थापना केली आहे. बुध्दिची धारणा. बुध्दिची अशी ठेवण हे शिकविलें आहे. पादुकांचं राज्य आहे. राज्य स्वामी रामाच्या पादुका आहेत म्हणजे या पादुकांच्या स्थानावर रामचंद्र आहेत. आपण त्यांचे नोकर आहोत. पहिल्यापासून ही बुध्दि आहे. चौदा वर्षेपर्यंत राज्य ताब्यात राहणार आहे पण बुध्दिची धारणा अशी आहे की राज्य रामाचं आहे मी केवळ एक सेवक आहे. चौदाव्या वर्षातील शेवटची रात्र संपली पंधराव्या वर्षाचा सूर्योदय होऊन, तोपर्यंत भरत जिवंत राहील. नंतर तुमचं राज्य तुम्ही कांहीही करा असे तो सांगून आला. **राज्य ताब्यात घेताना राज्य केव्हां सोडायचं आहे ही तारीख ज्याच्या लक्षात आहे तो त्यागी महात्मा आहे.**

दुर्योधनांनी पांडवांना घालवून दिलेलं आहे. नुसतं वनवासांत नाही. अज्ञातवास हा त्याकरितां आहे. शोधून काढायचं आणि पुन्हा १२ वर्षे वनवासांत पाठवायचं. म्हणजे सर्व काळ, शेवटपर्यंत राज्य आपल्या ताब्यात राहिलं पाहिजे. हे स्पष्ट आहे. **नंतर कौरवांसारखं करायचं का भरतासारखं करायचं हे ठरवायचं आहे.** त्यामुळे रामरायांना तुमचा भरताला सांगावं लागलं की तुझा त्याग मोठा की माझा त्याग मोठा - माझ्यापेक्षा तुझाच त्याग मोठा आहे. मला राज्य अजून मिळायचं नव्हतं. अभिषेकाची तयारी झाली होती. मुहूर्त पाहिला होता. परंतु अजून राज्याभिषेक पुढे व्हायचा होता । राज्य मिळालेलंच नव्हतं. परंतु तुझ्याकरता पिताजींनी आईच्या सांगण्याप्रमाणे राज्य मिळवून ठेवलेलं आहे. माझीही त्याला संमती आहे. अशी स्थिती असतांना तू राज्यापासून बाजूला राहिलेला आहेस. कोणाचा त्याग मोठा ? रामाचा त्याग मोठा की भरताचा ? लक्ष्मणाचा त्याग मोठा की सीतेचा ? हा सगळा विचार करण्याकरता रामायण लिहिलेलं आहे.

**बुध्दि संपन्न करण्याकरितां बुध्दि ही श्रेष्ठ धन आहे. मनुष्यजन्म मिळाल्यानंतर बुध्दिचं श्रेष्ठत्व आहे. पशूंपेक्षा मानव श्रेष्ठ का आहे. बुध्दिवादी म्हणजे बुध्दिनं शोध लावून चंद्रापर्यंत जाऊन पोचला - बुध्दिनंच पोचलेले आहेत. परंतु स्वतःची बुध्दिचं श्रेष्ठत्व, महत्व नाही. मिळालेलं सोडण्याची तयारी पाहिजे.** ती तयारी फार कठिण आहे. /स्वतःच्या ९

एकप्रकार त्यागी म्हणून महात्मा असू शकतो. स्वार्थ बुध्दिमध्ये उत्पन्न झालेला नैसर्गिक आहे. प्रत्येकाला स्वार्थ आहे. कोणीही सोडू शकत नाही. असा प्रेमळ वागणं होणं, बुध्दिला कठीण. म्हणून त्याचा निरोध करायचा आहे. तरं कोणी करू शकत नाही. अशा रितीनं त्यागाचीसुद्धा. पुष्कळ आहेत. ग्रंथ पुष्कळ आहेत. व्यासांनी. वाल्मिकींनी मोठमोठ्या ऋषींनी अनेक ग्रंथानं लिहून ठेवली आहेत. नीती अनितीचा विचार त्यांनी पुढे मांडलेला आहे. भगवद्गीतेमध्येसुध्दा दैवी संपत्ती. आसुरी संपत्ती मांडलेलीच आहे. महाराष्ट्रातसुध्दा पुष्कळ संत होऊन गेलेले आहेत. ज्ञानेश्वरमहाराज. तुकाराम. एकनाथ. नामदेव- पुष्कळ संतमहात्मे झालेले आहेत. त्यांचा उपदेशही आहे आणि आचरणही आहे. "आधी केले. मग सांगितले" बोलायचं असं एक. तसं एक. कांही व्हायचं नाही. कांही नाही. पुन्हा मला निवडून द्या असं म्हणायचंच पुन्हा निवडून यायचं आणि तरी सत्ता किती दिवस राहील ? मर्यादा आहे ना अमर्याद अशी स्थिती माणसाच्या वाट्याला नाही. सत्ता पांच वर्षे राहील. पुन्हा निवडणुकीला उभे राहावेच लागते त्याला. तो सुध्दा पांच वर्षे नाही हल्ली एक वर्षांतच पुन्हा निवडणूक घ्यावी लागते. अशी स्थिती आलेली आहे.

बुध्दि स्थिर नाही. बुध्दिनं सगळं काम चाललेलं आहे. योग्य आहे. बरोबर आहे. त्या बुध्दिमध्ये कांही दोष निर्माण झाला तर त्याला एक वर्षाच्या आंत सुध्दा सत्ता सोडावी लागते. निवडून आला असला तरीसुध्दा. हे सर्व बुध्दिनं निर्माण केलेले नियम आहेत ते अर्थात् अस्थिर आहेत. स्थिर राहू शकत नाही. कारण बुध्दि स्थिर नाही. तेव्हां बुध्दिनं निर्माण केलेले नियमही अस्थिर आहेत. म्हणून हे जे शब्दप्रमाण, शास्त्रप्रमाण आहे. श्रीकृष्णांनी सांगितले. "मी सांगितले सांगतो म्हणून तू ऐक असं नाही. शास्त्र आहे. शास्त्र हे मोठं प्रमाण आहे. ज्यामध्ये जीवांच्या हिताचा विचार केलेला आहे. जीवांना जे बरं वाटेल ते सांगावं ते निवडून यावं हा विचार निराळा आणि "हित" हा विचार निराळा. ते हित समजून घेण्याकरितां महात्म्यांची सज्जनांची संगति आपल्याला जरूर आहे आणि त्यांच्या संगतिप्रमाणे नीती अनिती ही समजून घ्यायची आहे. आणि न्याय्य मार्गानी आपण जावं. अन्याय्य मार्गानी जायचं नाही. हा अभ्यास करण्याकरितां मनुष्यजन्म आहे. विचारशक्ती ज्या बुध्दिनी करायची त्या बुध्दिची देणगी फक्त मनुष्यजन्मामध्येच आहे. दुसऱ्या कुठल्याही जन्मात नाही. या बुध्दिनं अनेक विचार करता येतात. योगशास्त्र भारतीय संस्कृतीमध्ये आहे. अशी इतर शास्त्रं पश्चिम संस्कृतिमध्ये नाहीत. आणि त्या सगळ्या शास्त्रांचा विचार करण्याकरिता परदेशी लोक पुष्कळ इथ येऊन राहतात. हे शास्त्र काय आहे ? यांनी मांडलेले विचार कसे आहेत ? जिज्ञासा त्यांना आहे ना? हे समजून घ्यावं अशी इच्छा त्यांच्याजवळ आहे. आणि इच्छा बाळगून शास्त्राचा शोध करतात.

विचार करतात, व समजून घेतात. भारताची विचारधारा कुंठून गेल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. धर्म आणि काय यांशिवाय दुसरा विचार नाही. धर्म म्हणजे काय आहे ? त्या धर्माचा काय उपयोग आहे. मोठमोठ्या श्रेष्ठ पुरुषांनी धर्माचरण कां केलेलं आहे ? त्यांत कांहीतरी गुण आहेत की नाहीत ? ही विचारसरणी आमची संपलेली आहे. राम झाले काय, कृष्ण झाले काय ? ज्ञानेश्वर झाले काय. आपल्या स्वतःच्या बुद्धिनं होईल तेवढा विचार आपण घेतला आहे. आणि बाकीचं कांहीही मानायला तयार नाही असा प्रश्न झाला आहे ? मार्गदर्शक जे आहेत त्यांच्याकडून मार्गदर्शन मिळवलं पाहिजे आणि त्या मार्गदर्शनाप्रमाणे वागलं पाहिजे म्हणजे चांगले संस्कार आपल्या बुद्धिला होतील. बुद्धिमध्ये असलेले दोष दूर होतील. चांगले गुण बुद्धिमध्ये येतील आणि अशी बुद्धि मिळविण्याकरिता अनेक जन्म घालवावे लागतात. अनेक जन्म आहेत. पूर्वजन्मही आहेत.

मी म्हणाले, "जो उपदेश केला तोच उपदेश मी पूर्वी सूर्यनारायणाला केलेला आहे. सूर्यनारायणाने मनूला केला त्याने पुढे ती ज्ञान परंपरा चालू ठेवली. अर्जुन म्हणाला. "तुम्ही सूर्यनारायणाला उपदेश केला ? सूर्यनारायण किती वयाने मोठा. त्याला तुम्ही कसा उपदेश करणार ? तुमचा जन्म तर किती अलीकडचा " म्हणजे अर्जुनाला समोर जे शरीर दिसतंय तेच डोळ्यापुढे आहे. या भावनेतून तो म्हणतो कि तुमचा जन्म अगदी अलीकडचा मग सूर्याला उपदेश तुम्ही कसे करणार ? त्यांनी सांगितलं. मलाही पुष्कळ जन्म झाले. तुम्हेही पुष्कळ जन्म झाले. ते मला माहीत आहेत. तुला माहीत नाहीत. ही बुद्धि निराळी. अर्जुन जरी जगामध्ये श्रेष्ठ धनुर्धारी ठरलेला असला तरी त्याची बुद्धि देहापर्यंत आहे. तुम्ही त्याला कसा उपदेश केला ?

म्हणजे आत्मा वेगळा आहे. शरीर वेगळं आहे हे बुद्धिने समजून घेता येतं. आणि ते समजून घेतल्यानंतर आपला उत्कर्ष होतो. केवळ आमची बुद्धि देहापर्यंत थांबून राहिली तर त्या बुद्धिला नीतीअनितीचा कांहीही विचार करता येणार नाही. रावण जरी मोठा होता तरी त्याची बुद्धि शेवटी बदलली की नाही ? अरण्यात कंदमुळे, फळे खाऊन राहणारे रामलक्ष्मण त्या रामाची पत्नी पळवून आणण्याची बुद्धि रावणाला कां झाली ? बुद्धिवर नियंत्रण नाही. शरीर म्हणजे मी - मी मोठा आहे . मीच सुंदर आहे. माझ्यापुढे कोणीही टिकणार नाही. अशी बुद्धि त्याला झाली. आणली - सीतेला पळवून आणली. बिभीषणानी सांगितली. मंदोदरी - त्याच्या पत्नीने सांगितले. इंद्रजितानी सांगितले. कुंभकर्णानी सांगितले पण नाही. बिभीषणाला त्याने उत्तर दिले. "परस्त्री, परस्त्री काय घेऊन बसला आहेस ? आम्ही राक्षस असा पुकारले आहोत की जगातील सर्व स्त्रिया आमच्या आहेत. आम्ही वाटेल त्या स्त्रीला आणू शकू." ही अशी संस्कृती जर जगात राहिली तर जगाचं काय होईल ? म्हणून रामांना हातात धोंडे घ्यावे लागले. ही संस्कृती जगात निर्माण होऊ द्यायची नाही.

अरण्यात राहणारे. शांतपणे तपश्चर्या करणाऱ्या ऋषींचा नाश हे राक्षस करतात - तेव्हां यांना जिवंत ठेवायचे नाही अशी प्रतिज्ञा करावी लागली. आणि ती त्यांनी खरी करून दाखविली. रामायणाचं एवढंच सार आहे.

एवढंच तात्पर्य आहे. न्याय्य मार्गांनी, योग्य मार्गांनी, स्वार्थ सोडून, सर्व समाजाच्या कल्याणाकरितां प्रयत्न करणारा जो राम त्याला हे पशुपक्षीसुद्धा साह्य करतात. वानरांनीही साह्य केलं "प्राण टाकूनसुद्धां रावणाला मारायचं" म्हणून त्यांनी सांगितलं. "अंधानम् तु गच्छतम्" ठेवून आपल्या बुद्धिवर आपण विश्वास ठेवला. शरीर म्हणजे मी आहे, मी मोठा बलवान् आहे असा अभिमानानं आणि अन्यायानं वागणारा जो आहे त्याला त्याचा सख्खा भाऊसुद्धा सोडून जातो. हे रामायणाचं सार आहे. या दृष्टिनं रामायण वाचलं पाहिजे. त्याचा विचार केला पाहिजे. आपणांही कल्याण करून घेतलं पाहिजे. समाजाला सर्व मार्गदर्शन केलं पाहिजे. अशी बुद्धि बनवला पाहिजे.

योग्य मार्गदर्शन करणारे, ज्यांनी आपली बुद्धि स्थिर केलेली आहे. संस्कारयुक्त केलेली आहे. सगळे रोग बुद्धिचे काढून टाकलेले आहेत. उत्तम गुणसंपन्न बुद्धि ज्यांनी बनविलेली आहे त्यांचं मार्गदर्शन हे आवश्यक आहे. ईश्वर आहे की नाही, विवेकानंदांनी रामकृष्णांना विचारलं. "कुठे आहे ईश्वर ? तुम्ही पाहिला आहे का ? ते म्हणाले. "तुला पहायचा आहे काय ?" दाखवू शकत होते ते त्यांनी दाखविला. अशी शक्ती असणारे, निर्दोष बुद्धिसंपन्न असणारे जे महात्मे आहेत त्यांचं मार्गदर्शन हे समाजाचं कल्याण करणारं आहे.

गुरुचरित्रांत एक कथा आलेली आहे. त्या कथेचा थोडासा विचार करू. महाराज नृसिंहसरस्वती दत्तात्रेय हे गाणगापुरला रहात होते. त्यांना त्रास झालेला आहे. संकटे आलेली आहेत असे अनेक मंडळी येत होती. एक ब्राह्मण एके दिवशी त्याच्या सर्वांग शरीराला कुष्ठरोग झालेला आहे. त्रस्त झालेला आहे. "महाराज, सगळे उपाय झाले. औषधं झाली. तीर्थ घेतलं, तीर्थयात्रा, तीर्थस्नान, सगळं काही झालं. हा शरीराचा रोग बरा होईना म्हणून मी आपल्याकडे आलेलो आहे. आपण जे सांगाल ते करायला तयार आहे. माझा एवढा रोग दूर करा. "थांब म्हणाले जरा", इतक्यांत एक माणूस शेतांत त्याच्या औदुंबराचं झाड पडलं होतं. त्याचं लाकूड खांद्यावर घेऊन निघाला होता. महाराजांनी या ब्राह्मणाला सांगितलं. "हे लाकूड घेऊन संगमावर जा. ते रोवून ठेव. त्याला रोज पाणी घालीत जा आणि या लाकडाला ज्यावेळी पानं येतील त्यावेळी तुझं शरीर चांगलं होईल", एवढं त्याला सांगितलं. दिसायला तर हे विरुद्ध दिसत आहे. वाळलेल्या लाकडाला पाणी घालून पानं येणार कशी ? तो ब्राह्मण गेला. निश्चयाने संगमावर स्नान करून पाणी घालू लागला. सात दिवस झाले. केवळ काही धर्म नाही. महाराजांच्या वचनावर पूर्ण विश्वास.

गावांतील काही शिकलेले मंडळी केवळ विचार करणार - आचार काही करावयाचा नाही. त्यांच्याकडे अगोदर गेली, त्यांना सांगितले. "दादांना बाबा उगीच त्रास देतात ? बांधलेल्या लाकडाला ज्या पानं आलेली आहेत की हा तू विचार कर. तो म्हणाला. गुरुमहाराजांनी सांगितलं, ते म्हणाले. सांगितले म्हणजे. तुझं पाप जाणार नाही. हे त्यांना माहीत आहे म्हणून त्यांनी सांगितलं. म्हणजे ते खरं मानायचं काय ? आपली बुद्धि कुठे गमवायची हे शिकायला नको का ? गुरुमहाराजांनी सांगितलं म्हणून काय झालं ? स्वतःच्या बुद्धिनं विचार करून ठरव." "नाही" तो म्हणाला "स्वतःच्या बुद्धिचा विचार मी कुठे करणार नाही. गुरुमहाराजांचं वचन आहे. "लाकडाला पानं फुटतील तेव्हां माझं शरीर बरं होणार आहे". या अर्थी लोकांना कांही उपदेश करण्याची गरज नव्हती. महाराजांना सांगितलं. तो करायला लागलेला आहे. पण यांनी त्याचा बुद्धिभेद करण्याचा प्रयत्न केला. तो कांही ऐकेना. तसे महाराजांकडे गेले. "काय महाराज सांगून ठेवलेलं आहे ? अन्नपाणी घेत नाही. लाकडाला पाणी घालतो आहे. लाकडाला पाणी घालून पानं येतील का ?" महाराजांना सांगून कशाचं आपण परोपकार करतो आहोत. एका माणसाचा प्राण वाचवायचा आहे अशी भूमिका घेतली त्या लोकांनी. तसल्या लोकांना जन्माला घातलं त्यांना वाचविणार निराळा आहे ही कल्पनाच नाही. महाराज म्हणाले." त्याच्या बुद्धिचा निश्चय असेल तर फळ मिळेल. न मिळायला काय झालं?" म्हणून त्यांनी एक कथा सांगितली.

एक राजा शिकारीकरीता गेलेला आहे. त्याच्या सैन्यामध्ये काही सेवेकरी होते. अरण्यामध्ये गेला. तहान लागली. पाणी शोधण्याकरिता ते निघाले. एका सरोवरांत एक देऊळ दिसले व त्यांत एक शिवलिंग त्यांना दिसले. तो राजा तिथे आलेला आहे. "काय रे काय पहाताहात ?" एक शिवलिंग आहे. पूजा करावी अशी माझी इच्छा आहे. काय ? अशी खूप शिवलिंग पडलेली असतात. तरी मला वाटतं शंकराची पूजा करावी. "कर" म्हणाले. मग सांगा तुम्ही का करु काय करु. रोज पूजा करत जा - गंध पुष्प धूप दीप नैवेद्य - प्रतीक आहे ते प्रतीकाच्या ठिकाणी पूजा करायची आहे. मूर्तिमध्ये ईश्वर कुठे आहे ? मूर्ती जड आहे. हा जो बुद्धिवाद आहे - सर्व ठिकाणी ईश्वर आहे हे मानायचं आणि मूर्तिमध्ये ईश्वर नाही म्हणायचं. हा बुद्धिवाद म्हणजे किती विसंगत आहे. पण सर्व ठिकाणी, समजण्याकरिता मूर्ति हे प्रतीक शास्त्राने सांगितले आहे. या शास्त्रांनी जायचं. सर्व ठिकाणी ईश्वर आहे हे तत्त्वज्ञान सहसा कोणालाही एकदम पटत नाही. सर्व ठिकाणी ईश्वर आहे तर स्वार्थ जायला पाहिजे. लोकांकरिता प्रयत्न करायला पाहिजे. तो स्वार्थ तर सुटत नाही. मूर्तीची पूजा करु नका. हे करु नका वगैरे उपदेश आपण करतो. पण तो शास्त्र संस्कार संपन्न काम होता. सांगणाराही मोठा ईश्वरकृपासंपन्न आहे. असे तुझी बुद्धि स्थिर झाल्यानंतर सर्व भूतांच्या ठिकाणी परमेश्वर आहे हे हळूहळू स्थिर होईल. त्याकरितां मूर्तिपूजा आहे. समजे झाल्यानंतर

स्मशानामध्ये जे चिताभस्म आहे त्यांनी तू देवाला नैवेद्य दाखवीत जा. हे त्या राजपुत्रांनी त्याला सांगितलं.

आला घरी तो. आपल्या पत्नीला सांगितलं. शंकराचं लिंग मिळालं आहे. उद्यापासून पूजा करू. पत्नीलाही आनंद झालेला आहे. मनामध्ये चांगले संस्कार आहेत. पूजा रोज करतो आहे. चिताभस्मही रोज आणतो आहे. सकाळी जाऊन घेऊन यायचं. स्मशानामध्ये मृत्यू कोणाचातरी झालेला असायचा. थोडं भस्म आणायचं, नैवेद्य दाखवायचा. असंच चाललं आहे. निश्चित बुद्धि आहे. मनामध्ये संशय वगैरे कांहीही नाही. एके दिवशी असं झालं. त्या गावांत कोणालाही मृत्यू आला नाही. स्मशानामध्ये चिताभस्म नव्हते. दुसऱ्या जागी गेला. ५-७ गावांत गेला पण चिताभस्म मिळालेलं नाही. घरी आला आणि आपल्या स्त्रीला सांगितलं. चिताभस्म मिळत नाही. गुरूंनी सांगितल्याप्रमाणे आपली पूजा झाली नाही तर काय करायचं? मग मी स्वतःच शरीर अर्पण करतो. आजकाल भक्तीमार्ग नाही असं दिसत नाही. पण भक्तीमार्गाप्रमाणे यथाशास्त्र पूजा व्हायला नको का? देवाची पूजा करतांना सर्व साधनसामुग्री तयार झाल्यावर पूजेला सुरुवात करावी असं शास्त्रकारांनी सांगितलं. नाहीतर ऐन वेळेला, "चंदनच राहिलेलं आहे, थांबा", चंदन घेतं आहे, मग पूजा करतो. देव आहे आणि भावनेनं पूजा झाली पाहिजे. कोणी मंत्री म्हणा, साहेब म्हणा घरी आल्यावर "थांबा हो आमची करंजी व्हायची आहे. थोडावेळ पानावर बसा. झाल्यावर वाढू" थोडं थांबा असं सांगतो का आपण? सगळी तयारी करून नंतर पूजा करायची.

तर त्याप्रमाणे हे चिताभस्म त्याला पाहिजे होतं. ते मिळाल्याशिवाय त्याची पूजा पूर्ण होणार नव्हती. इतके दिवस पूजा केलेली फुकट जाईल अशी तळमळ त्याला लागली. त्याची धर्मपत्नी त्याच्यापेक्षाही सवाई होती. बुद्धिमध्ये जे संस्कार आहेत. बुद्धि कोणाची मोठी व कोणाची लहान हे शास्त्र लिहणारांनी समजून घ्यायचं आहे. कुंभाराचं उदाहरण नाही का भक्तविजयामध्ये. तो संधि आवा लावलेला होता. त्यांत एक मांजरी प्रसूत झालेली होती. पेटविला तो आवा. नंतर त्याला समजलं त्याला वाईट वाटलं ही मांजरी आता मरून जाणार. त्यानं पांडुरंगाची प्रार्थना केली की ती वाचली तर सर्वस्व दान करून पंढरपूरला येऊन राहीन. आवा शांत झाला. ती मांजरी व तिची पिलं वाचलेली आहेत. त्यांनी सर्व सोडून दिलं. सर्व लोकांना दान देतं आणि दोघे पतिपत्नी पंढरपूरामध्ये येऊन राहिली. रानांत जाऊन लाकडं आणायची. विकायची आणि काय येतील त्या पैशातून धान्य वगैरे आणायचं. पांडुरंगाला अर्पण करायचा नैवेद्य. कोणी भुकेला त्यावेळी आला तर त्यालाही त्यातला अर्धा द्यायचा. नंतर आपण खायचं. "चित्ती असू द्यावे समाधान" याला महत्व आहे. पैशाला किंवा बाकी कशाला महत्व नाही. ते समाधान आणि धर्माशिवाय होणार नाही. दरिद्री किंवा

आहेत दोघेही. लाकडं आणायची. ती विकायची. काय मिळेल तेवढ्या धान्यावर उपजिवीका करायची. रुक्माबाईंनी पांडुरंगाला विचारलं. "तुमचा भक्त एवढा कष्टात आहे, त्याला कधीतरी धन द्याकी" "बाई तो धन घेणार नाही." "मी देते", रुक्मिणी म्हणाले. "तुमच्या प्रयत्नांचा उपयोग होणार नाही." "तुला करायचं तर कर". दुसऱ्या दिवशी हे पतिपत्नी अरण्यांत निघालेले असतांना तो कुंभार पुढे होता. त्याच्या पाठीमागे त्याची स्त्री होती. त्या कुंभारासमोर रस्त्यांत एक थैली उघडी पडलेली आहे. तोंड तिचे उघडे आहे. त्या तोंडातून काही मोहरा मातीत पडल्या होत्या. म्हणजे ती मोहरांची थैली होती. त्या कुंभाराला त्या मोहरा दिसल्या. घेण्याची इच्छा उत्पन्न झाली नाही. परंतु मागाहून पत्नी येत आहे. कदाचित तिला जर इच्छा उत्पन्न झाली तर काय करायचं ? म्हणून जवळची माती घेतली आणि त्या सोन्याच्या मोहरांवर टाकली. त्या बाईंनी पाहिलं. म्हणाली. "पांडुरंगाची भक्ति होय केलीत का ? सोन्याला मातीपेक्षा जास्त किंमत आहे असून तुमची अशी समजूत आहे. "सोने ही आम्हा मृत्तिकेसमान" म्हणतात नां. मातीपेक्षा सोन्याची किंमत जास्त समजत नाही. माझ्या मनाला सोन्याचा मोह उत्पन्न होऊ नये म्हणून माती टाकलीत होय चूक आहे आणि सर्व शास्त्रामध्येसुद्धां सुवर्णादि सर्व धातु जमिनीत उत्पन्न होतात आणि मग ते शुद्ध करायचे व सोन्याच्या त्याने विकायचे. त्याला पिवळा रंग आहे. ते जड आहे. अर्थात ते माती पार्थिव आहे. पृथ्वीपासून उत्पन्न होत असल्यामुळे पार्थिव आहे. शास्त्रकारांनी त्याला तैजस ठरवलं आहे. त्यात काही तेजाचा अंश असतो म्हणतात. म्हणून सोनं कितीही अग्नीवर ठेवलं तरी आटून जात नाही. पाणी आटून जातं. तूप आटून जातं. बाकी सगळे पदार्थ आटून जातात. सोनं का आटत नाही ? पार्थिव जर असेल केवळ तर ते आटलं पाहिजे. ज्याअर्थी आटून जात नाही त्याअर्थी त्याच्यामध्ये तेजाचा अंश आहे. म्हणून आटून जात नाही. असं शास्त्रकार सांगताहेत. तेव्हां त्या स्त्रीनं आपल्या पतीला सांगितलं की तुमची बुध्दि सुधारा अशी पांडुरंगाची प्रार्थना करा. सोनं घेण्याची इच्छा दोघांनाही झाली नाही. पण तो कुंभार त्याच्या पत्नीपेक्षा कमी दर्जाचा ठरलेला आहे. सोनं आणि माती यांच्यात अंतर नाही. माती कोणी पिशवीत भरून घेऊन जाऊ या असं कोणाला वाटेल काय? तसं सोन्याच्या मोहरा भरून घ्या असं वाटून उपयोग नाही तर खरी बुध्दि. हे ज्ञान. हा महत्वाचा विषय.

तर याची पत्नीही फार विवेकसंपन्न आहे. आणि मोठी पतिव्रता आहे. त्या स्त्रीने सांगितलं की तुम्हाला काळजी करायचं कारण नाही. मी आता जाते. तुम्ही कपडा लावून घ्या. घर पेटवून द्या. मिळेल ते अन्न ईश्वराला अर्पण करा. म्हणजे तुमची पूजा पूर्ण होईल. हे पतीबद्दल प्रेम आहे. ईश्वराच्या भक्तीबद्दल पूर्ण श्रद्धा आहे. त्यामुळे हे सहज आहे. आता काहीतरी विचार निघालेले आहेत

सती जाऊ नये वगैरे - कायदे करण्यात आलेत. किती दुराचार वगैरे चालले आहेत. त्याकडे काहीही लक्ष नाही. त्या स्त्रीला आपल्या पतीबद्दल अत्यंत प्रेम आहे. ती स्त्री आपलं जिवंत शरीरसुद्धा अग्नीमध्ये टाकू शकते. त्यांत पुष्कळ धैर्य आहे. पती जिवंत असताना पतीची इच्छा पूर्ण करण्याकरिता आपलं शरीर अर्पण करायला निघाली आहे. हे विचारसुद्धा आपण ऐकलेले नसतात. त्यामुळे हे सगळं आपल्याला खोटं वाटतं. हे अंधश्रद्धा निर्मूलन संस्था निर्माण झालेली आहे आणि सदैव निर्मूलन करण्याचा प्रयत्न चाललेला आहे. राजस्थान असं करते तिथे आम्ही काय बोलणार ? कांही ठिकाणी अन्याय होतो - नाही असं नाही. लॉर्ड बेंटिंक किंवा कोणी होता त्यावेळेला व्हाईसरॉय. हे सगळं जे सती जाण्याचं सुरू झालेलं होतं. त्यांत कांही खोट्या घटना होत्या. त्या मुलीची संपत्ती असली तर तीला बळेच चितेमध्ये टाकायचे आणि ती संपत्ती घ्यायची. हे त्यांच्या नजरेला आलं म्हणून त्यांनी कायदाच करून टाकला अन्याय होतो. पण कांहीठिकाणी असे प्रेम असू शकते की पतीच्या कार्याकरिता स्वतःचा देहसुद्धा अर्पण करण्याची तयारी असते. रमाबाईंनी माधवरावांबरोबर सती गेली. हे खोटं नाही. राम-रावणांची लढाई झालीय. नाही. कौरव पांडवांची लढाई झालीय नाही. कारण बोलायला कोणी प्रतिबंध करत नाही लिहायला करत नाही. बोलून टाकायचं.

त्या स्त्रीनं सांगितल्यानंतर याच्या मनामध्ये थोडासा मोह उत्पन्न झाला. शंकराची तर पूजा सांगितल्याप्रमाणे यथाविधी घडली पाहिजे. स्त्री शरीर द्या. म्हणाली. "हां देऊ". तुझे आईबाप मला काय म्हणतील ? पुन्हा असून मुलबाळ कांही झालं नाही. एकेक भोळ्याचे विचार मनामध्ये येतात. लोक काय म्हणतील मला ? पण त्या स्त्रीनं सांगितलं. "महाराज, माझा देह हा तुमचाच देह आहे. आणखी मी आहे ना ? तुमच्या ईश्वराच्या कार्याकरता माझा देह गेला तर माझे होईल. शंकराची आज्ञेवर पुरा होईल. मी अगदी मनापासून सांगते आहे. त्याचं समाधान केलं. ती आत गेली. याने आग लावली. सगळं घर दार जळून गेलं. याने शंकराची यथाविधी पूजा केली आणि हे मध्याचा नैवेद्य दाखविला. रोजची सवय, शंकराची पूजा झाल्याबरोबर आपल्या पत्नीला हाक मारायची. ये बाई लवकर, तीर्थप्रसाद घ्यायला. त्यावेळेला हे सगळं विसरून गेले. घरदार गेलं. पूजा झाल्याचा आनंद मनाला झाला. रोजच्याप्रमाणे आपल्या स्त्रीला हाक मारली. लवकर ये बाई. तीर्थ घे व प्रसाद घे. आणि आतून बरोबर. घर सगळं आहे आणि पतिव्रता आलेली आहे. मग त्यांना आठवलं, की तीला आपण जाळून टाकली होती. "मी ओळखलीहोती" म्हणाली. म्हणजे त्याच ज्या बुद्धीनं झाला आहे. त्या शंकराची बुद्धि त्याच्या स्त्रीची बुद्धि त्याहीपेक्षा एक लोकोत्तर बुद्धि आहे. हे सर्व मानण्याची सुद्धा बुद्धि आज

असण्याबद्दल नाही. आज तर्क करण्याची बुद्धि तर फारच दूर आहे. किती जन्म त्याचे लागतील त्याकरितां याचा नेम नाही. प्रत्येक धडा चढलेली आहे. सत्य आहे, ईश्वराय आहे, एवढं सुंदर आपल्याला मानायला नाही. अशा बुद्धिवाद अध:पात अल्पा होतो आहे. ईश्वराची भक्ती करणारा, योग्य मार्गाने व्यवहार करून आले आहे त्याप्रमाणे त्यागी महात्मा. त्याचा संसारही राहतो आणि परमार्थही राहतो. पण उदाहरण त्याचा संसार गेला नाही. त्याने स्त्रीला आणले पण त्याला पुन्हा मिळाली. प्रत्येकाने बुद्धिचा दोष काढून टाकले पाहिजेत. आणि प्रत्येक व्यक्तीने बुद्धि अधिक गुणसंपन्न केली पाहिजे. त्याकरिता संन्याशी जरूरी नाही, शिवाजीची जरूरी नाही, कायद्याची जरूरी नाही. प्रत्येक व्यक्तीला आपल्या कर्तव्याचा उपदेश आत्मज्ञानाने मिळाला आहे. प्रत्येक काळांत संतमहात्मे आहेत, आले, संतमहात्मे उपदेश करताहेत. त्यांचे उपदेशाचे कार्य व्यवस्थितपणाने चाललेलं आहे. आपण असे दु:ख पहात राहिलो. आपली समजी दु:खांतून गेली. मनाची दु:खी आहेत ना. सुखी आपण मनाची झालो असं समजतो. पण सर्व सुख नाही. पैसा मिळाला, न्याय-अन्याय कुठला पैसा असला, शरीर आपलं चांगलं. आपला व्यापारधंदा व्यवस्थित मिळाला. मुलाबाळांना मिळालं म्हणजे झालं. एवढा विचार करण्याची जरूर काय असं आपल्याला वाटतं. पण ते बरोबर नाही.

द्रौपदीची अशी बुद्धि झाली होती. पांडव वनवासांत आले तर द्रौपदीला वाईट वाटलं होतं. कुठेतरी झाडाखाली पडायचं. थंडी-वारा. पांघरायला नाही. त्यात द्रौपदीने धर्मराजाला म्हटलं, "काय तुमच्या धर्माचा उपयोग झाला? ईश्वर आहे कि नाही असा तिच्या मनांत संशय उत्पन्न झाला. अन्यायाने वागणारे कौरव आज साम्राज्य मिळवलं आणि धर्म धर्म म्हणून तुम्ही समजायांनी धर्माने वागण्याचा प्रयत्न केला तर तुम्हा वनवास भोगता आहात? धर्म बरा की अधर्म बरा, धर्माला कुठवर किती मानायचं. तेव्हां धर्मराजाने उत्तर दिलं. "बाई, मी राज्याकरता किंवा सुखाकरीता धर्माचरण करत नाही धर्मच माझ्या पदरांत काहीतरी फळ पडावं म्हणून मी धर्माचरणाने वागतो आहे असं नाही. प्रत्यक्ष ईश्वराची आज्ञा आहे, त्या आज्ञेचे पालन करतो आहे. धर्माप्रमाणे मला राज्य मिळावं म्हणून धर्माचरण केलं तर ते धार्मिक व्यापारी ठरेन मी. काय हातात पैसा पडला तर मला धार्मिक, नाहीतर नाही. असा तर धर्माचा व्यापार झाला. इतकी उच्च कोटीची धर्मबुद्धि धर्मराजाबद्दल होती म्हणून साधुसंतांसुद्धा धर्मराजच राजा झाला पाहिजे असं वाटलं. ईश्वराचा जो संकल्प झाला तो पार करिताच. दुर्योधन राजा होऊन चालणार नाही. रावणांनी राज्यावर राहून चालणार नाही. असं रामायणात दर्शविलं आहे. स्वत: नेता अन्यायी आहे, बाकीचे लोक अन्याय का सोडतील? एकाला पाहून दुसराही अन्यायाने वागू लागतो आणि अन्यायाचाच प्रसार सगळीकडे होतो. म्हणून ही

कुणाच्या कल्याणाला ईश्वराचे अवतार निरनिराळ्या वेळेला होताहेत. संत-महात्मे ईश्वराच्या आज्ञेप्रमाणे कार्य करतात. ही गोष्ट नृसिंहसरस्वती दत्तात्रय महाराजांनी त्या शिष्यांसमोर सांगितली. "असं होतं" म्हणाले. त्याची मदत असं गट होऊन, मायक्काला पाणी पाजले.

तुम्ही जो वर्गीकरण मात्र आपल्या बुद्धिनी ठरविलेला आहे, तो आतापर्यंत वाचलेल्या आकाला कशी पाने आलेली नाहीत म्हणून ठरविला. आपली अनुभवमध्ये काय होईल ते ठरविण्याची शक्ती तुमच्या बुद्धिमध्ये नाही. बुद्धिनं सर्व काही करता येत नाही. जरी लोकोत्तर बुद्धि आहे असं आपण म्हणलं तरी कोणी ठरविलं. सर्वांपेक्षा गुरु बुद्धिमान आहे असं ठरवता येईल का आपल्याला ? भूतकाळांत कोणी याहेक्षा बुद्धिमान झाला नसेल का ? भविष्यकाळांत याहेक्षा बुद्धिमान कोणी होणार नाही का ? हाच सर्वांत बुद्धिमान आहे याच सर्वांनी ऐकलं पाहिजे हे ठेंसलायच का ? हे ठरविता येणार नाही. त्याची बुद्धि स्वतःची व्हावी अनेक तर्क त्याला फळ मिळेल. हे प्रयत्नवादाचे सुंदर [illegible] उदाहरण आहे. हा दैववाद नाही, शास्त्रीय प्रयत्नवाद आहे. शास्त्रीय प्रयत्नवादांत गुरुचा मदत. विचार पाहिजे. व्यवहारांत काही काही मारवाडी लोक वाटेल तिथे जातात. वेडयापाडयांत कोणच्याही प्रांतात जातात, पैसा - १० हजार रुपये मिळेपर्यंत मला जायचा नाही असे ठरवितात. प्रयत्न आहेत, मदत आहे.

आपला प्रयत्न आहे कुठला म्हणायचा ? १ लाख रुपये मिळेपर्यंत अमुक जायचं नाही असा प्रयत्न करतात. निश्चय. व्यवहारांत सांग गुरुचा प्रयत्नवादात मदत. विचार ठेवावा लागतो. बी.ए. एम.ए. व्हायचं. पुढे काय होईल ? सांग काय कुठेही जाता येतो. पण आपल्या मनाशी निश्चय केला. अमुक अमुक असं प्रयत्न केला. तो मोठा डॉक्टर झाला. एम.डी. झाला. हो उदा. म्हणून प्रयत्न करायचा आहे म्हणजे व्यवहारांतसुद्धा प्रयत्नवादाचा आरंभ करतांना पूर्ण विचार ठेवून करावा लागतो. विचार नसेल तर प्रयत्न होत नाही. हा शास्त्रीय प्रयत्न आहे. संतमहात्मे त्या मार्गाने गेलेले आहेत. ईश्वरावतार सर्व शक्तीसंपन्न त्याला सहाय्यक आहे. म्हणून कोणाचं तरी मार्गदर्शन अपेक्षित आहे. केवळ आपल्या बुद्धिनं व्यवहार होणं अशक्य आहे. त्यासाठी मार्गदर्शनाची जरुरी आहे. म्हणून ईश्वराची जरुरी सहाय्यक म्हणून तरी घ्यायला पाहिजे, संत सांगताहेत.

भारतवर्षातील हे सिद्धांत आहेत. भारताच्याचे हे धन आहे. "भूता परस्परे पडो. मैत्र जीवांचे" केवढा उपदेश श्री ज्ञानेश्वरमहाराजांनी केला आहे. राष्ट्राला उद्देशून आहे. वैयक्तिक नाही. सर्वांही समाजाकरताच सांगितले आहे. परस्परांनी परस्परांच्या प्रेमाने वागावे हे त्यांनी [illegible] सांगितले आहे. परस्परांची प्रेमी जर नसेल. मग तेवढं [illegible]

आणि म्हणजे माझे, माझे धन, मुलं बाळे, दुसरीकडे लक्ष नाही, अशी जर वृत्ती असेल, देहाभिमानाची वृत्ती, वाढत गेली तर बुद्धि कमी कमी व्हायला पाहिजे पण तीच ईश्वराची भक्ती आहे.

हे चि थोर भक्ती, आवडते देवा - संकल्पाची माया संसाराची

संसारातील आसक्ति कमी झाली पाहिजे, स्वार्थ कमी झाला पाहिजे, हीच ईश्वराची भक्ती म्हणून संतांनी सांगून ठेवली आहे. बुद्धीची शुद्ध करा व करा पवित्र बुद्धि करी सुधारा. दोन्ही सुधारणी बुद्धि १ ते आहेत, त्याच्या त्याच्या परिस्थितीत विचार करा. जो आपलं मानतो म्हणजे आपल्या बुद्धीचीही सुधारणा होईल, दुसऱ्या स्वतःकरिता समाजाकरिता आपल्या बुद्धीची जरूरी आहे, त्याशिवाय सुधारणा करणे. अशीने हे कार्य होणार नाही. अशा मिळाली तरी दुःख सुखे निर्माण होतात, अनुकूल, प्रतिकूल दोन्ही पण असतात, बुद्धिव्यवहारामध्ये कितीतरी पथ असतात, पण हा आत्मीय बुद्धिवाद मात्र एक आहे, म्हणजे ईश्वराची उपासना करून आपल्या बुद्धितील दोष दूर करून व्यक्तीचे आणि समाजाचे कल्याण करावे.

हे विश्वची माझे घर, ऐसी मती ज्याची स्थिर
किंबहुना चराचर, आपणची जाहला

हे श्रेष्ठ बुद्धिचे वर्णन ज्ञानेश्वरमहाराज करताहेत. माझे घर म्हणजे माझे ओस सैपाक एका गावाचे, एक हद्दीत असेल तितकेच आम्ही समजतो, पण संपूर्ण विश्व माझे आहे, राष्ट्र माझे आहे हा ममता हा गुण आहे आणि संकुचित ममता एवढेच घर माझे आहे हे मानणे हा दोष आहे. ममता वाढायला पाहिजे. सगळे माझे आहेत, सगळ्यांकरिता प्राण द्यायची वेळ आली तरी चालेल. अशी तयारी त्या बुद्धिमध्ये निर्माण होऊ शकते. म्हणून ती बुद्धि तयार करणारा, राष्ट्रकार्य करणारा, विश्वाचे कार्य करणारा सर्वांना या बुद्धिचा फार मोठा उपयोग आहे पण ती बुद्धि चांगली बनविली पाहिजे, एवढेच संतांचे सांगणे आहे. "बुद्धिग्राह्य धर्म" पण बुद्धि चांगली नसतांना तुम्ही विचार-पाठीमागून जेवढे तर राखा, ईश्वरासक्त होईल.

आज दृष्टीने या प्रसंगाने अधिक जोरे सर्व ज्ञानाचे संतांचा परिचय होण्याचा योग माझ्यावर जास्त आला या ठिकाणी आला. भारतामध्ये ईश्वराचा साक्षात्कार संतांनी दिलेला आहे आणि तो आज होणार आहे. निःस्वार्थी महात्मे हे आहेत त्यांचा संकल्प फुकट जाणे शक्य नाही. म्हणून हा एक विश्वास आहे. साम्यवाद भारतामध्ये येणे शक्य नाही, रशियामध्येही आता आत्मपरीक्षण सुरू झाले म्हणतात, आपल्या चुकांची जाणीव झाली आहे व त्या सुधारण्याचा प्रयत्न करताहेत, भारतात साम्यवाद येणे शक्य नाही हे आपणसुद्धा समजून घेऊ.

सेवा कायावाचा मनाने व्हावी या उद्देशाने हा उत्सव चालू आहे. फक्त स्थान बदल आहे.

ईश्वराची, सद्गुरूंची कृपा आहे. संसारामध्ये रोज अगदी पंचपक्वान्नाचे जेवण मिळाले तरी कंटाळा येतो. आज भाजी भाकरी करा, अमुक करा असे आपल्याला वाटते. स्वभाव आहे। त्याचप्रमाणे हा उत्सव प्रतिवर्षी करायचा आणि पुष्कळ वर्षे झाली, खूप वर्षे झाली, असे न वाटता, तो काळ कसा आला की अगदी वेळ मागल्यासारखे सर्व मंडळींना होते. आणि त्याप्रमाणे ईश्वरकृपेने सगळे चालले आहे. या उत्सवामध्ये काही भाग घेण्याकरिता नीलाताई, डॉक्टर वगैरे मंडळी आम्हाला बोलावतात. पावसापाण्याचे वेळ लागतो, अडचणी येतात, भाग्य असेल तर येणे होते असे म्हणायचे।

संतांनी सांगितलेले विचार या ग्रंथांतून, स्तोत्रे, त्याचे चिंतन झाले पाहिजे. मार्गदर्शनाकरिता त्यांनी शास्त्रसिद्धांत मांडलेले आहेत. आणि ते संतांनी आचरणात आणलेले आहेत. त्यामुळे त्याला विशेष महत्त्व आहे. नुसती पुस्तकी विद्या नाही. श्रीमच्छंकराचार्य, श्रीवासुदेवानंद सरस्वतीस्वामी महाराज आचार्यांचा यांनी तोच सिद्धांत पुन्हा आपल्या ग्रंथात सांगितलेला आहे. त्यांच्या स्तोत्रापैकी "घोरात्कष्टात्" हे स्तोत्र प्रसिद्ध आहे. त्यातला हा दुसरा श्लोक आहे. सर्व वाङ्‌मयातीलच याचा विचार केलेला असेल. त्याचा अभ्यास करणारी पुष्कळ मंडळी आहेत.

"त्वं नो माता त्वं पिताप्तोऽधिपस्त्वम्, त्राता योगक्षेमकृत्सद्गुरुस्त्वम् ।
त्वं सर्वस्वं नो प्रभो विश्वमूर्ते, घोरात्कष्टाद् उद्धरास्मान्नमस्ते ।

मानसिक धारणा कशी असावी याबद्दल हा श्लोक आहे. शरीराने काय काय करायचे ते क्रियात्मक आहे. मनाने एकंदर ईश्वरस्वरूपाची धारणा कशी करावी याबद्दलचा हा श्लोक आहे. जगामध्ये आदरणीय किंवा अनुकूल आपल्यावर प्रेम करणारी जी जी मंडळी असतील तिकडे आपले लक्ष असते. माता, पिता, बंधु हे तर आदरणीय आहेत. कल्याण करणारी ही मंडळी आहेत ज्यांच्या सेवेमुळे जीवन मंगलमय होते. पण आणखी जी मंडळी आहेत त्यांचा विचार करायला लागलो असताना मुली आहेत, बायका आहेत, मित्र आहेत अशी प्रेमाचा विषय असणारी अनेक मंडळी संसारात असतात. त्या सर्व मंडळींच्या ठिकाणी आपली वृत्ती कशी असावी हा विषय इथे मांडला आहे.

माता, पिता, आप्त म्हणजे यांत सगळ्यांचा समावेश केला आहे. मात्यापित्याशिवायची सर्व मंडळी म्हणजे आप्त मंडळी। त्याचप्रमाणे जो नियामक असतो त्याचाही उल्लेख केला आहे. तो नियामक प्रेम करणाराही असतो कदाचित कठोरपणे वागणाराही असेल. त्याचप्रमाणे संकटकाळी आपल्या उपयोगी पडणारा, आपले संरक्षण करणारा त्राता आणि सद्गुरूंचाही यामध्ये उल्लेख केलेला आहे. "योगक्षेमं त्वं सद्गुरुः" आणि शेवटी "त्वं सर्वस्वम्" म्हणून

म्हणून म्हटले आहे. ही उल्लेखलेली ही मंडळी आहेत. याशिवाय ज्या ज्या ठिकाणी आपल्याला आत्मीयता वाटते. हे आपले आहेत. आपल्यावर प्रेम करणारे आहेत, चांगले आहेत, अनुकूल आहेत, या सर्वांचाही उल्लेख करून ईश्वराची प्रार्थना करताना हे सर्वही तूं आहेत. त्वं नो माता, त्वं पिता आप्तः अशी भावना केलेली आहे. माता पित्यांच्या ठिकाणी ईश्वरभावना धारण करणे हाही एक अर्थ यामध्ये अभिप्रेत आहे , नाही असे नाही. हे सगळे च आहे, संसारामध्ये अनुकूल असणारे, अनुकूल वाटणारे, यांच्याबद्दल आत्यंतिक प्रेमआत्मीयता आपल्याला वाटते, हे सगळेही प्रेमाचे विषय आहेत. हे ईश्वरच आहेत, अशी धारणा म्हणजे हे सर्वही पदार्थ असून त्यांना ईश्वर समजणे हा ही एक अर्थ आहे.

परंतु दुसराही अर्थ म्हणजे हे सर्वही मनांतून विसरून जाणे आणि केवळ तूंच आहेत. "त्वमेव सर्वम् मम देव देवो" ही प्रार्थना आहे. पण ही मनाची धारणा म्हणजे उच्च भूमिकेवर असलेले जे ज्ञानी महात्मे आहेत त्यांच्या दृष्टीने आहे. माता, पिता, आप्त, भ्राता, सद्गुरु हे सगळेही मनांतु जावे व केवळ सच्चिदानंदरूप स्वरूप मनामध्ये राहणे, ही ज्ञानदृष्टि आहे. समाधीअवस्था ज्याला साध्य झालेली आहे तो महात्मा या दृष्टिने राहु शकतो. अंतर्मुख दृष्टी झाली पाहिजे. आत्मस्वरूपाच्या ठिकाणी अखंड मनवृत्ति स्थिर होणे म्हणजे मनांतील इतर सगळे विषय जाणे. "जगा चे पडलेचि नाही, त्याची वार्ता पुसति काही" असे म्हणतात. गोपालकृष्ण भगवान् रोज पहाटे ५ वाजता उठायचे, हात पाय धुऊन अगोदर स्वरूपानुसंधान करीत. केवढ्या थाटाशी त्यांच्या चाललेल्या जगाचा सांभाळ करायचा म्हणजे देवांची तक्रार आहे, देवांची संकटे, मानवांची संकटे, चांगले वागणारे, वाईट वागणारे, सगळे त्यांच्याकडे येत होते. दुर्योधनालाही त्यांचे सहाय्य पाहिजे होते, अर्जुनालाही त्यांचे सहाय्य पाहिजे होते. सगळी हीं मंडळी आहेत. उठल्याबरोबर म्हणाले, "काय वस्तुस्थिती आहे आत्मस्वरूपाचे चिंतन करायचे आहे.

स्वरूपानुसंधान हे अतिशय महत्वाचे सांगितले आहे. पण ते पुरत नाही. म्हणून दुसरी दृष्टी त्यांनी सांगितली आहे. त्याचाही विचार आपल्याला करायचा आहे. नामरूपात्मक सगळेही विश्व संपलेले आहे. मनांत काही बाकी विसरून गेलो आहे. विद्यार्थ्यांना विषय समजून सांगण्यासाठी शिक्षक वर्गात फळ्यावर तो विषय लिहितात, समजल्यानंतर पुन्हा पुसून टाकतात. अध्यारोप आणि अपवाद संबंध समजून घेण्याकरता नामरूपात्मक विश्व मनामध्ये ठसवायचे व नंतर ते सर्व विसरून जाऊन ईश्वररूपी जो परमात्मा आहे, त्याचेच केवळ चिंतन करणे ही अवस्था फार मोठी आहे. आचार्यमहाराजांच्या अनेक ग्रंथांपैकी, स्तोत्रवाङ्मयापैकी साधन पंचक म्हणून आहे. त्यात हा श्लोक आहे.

"एकान्ते सुखमास्यतां परतरे चेतः समाधीयताम् ।

"एकान्तामध्ये बसा" अशी पहिली आज्ञा आहे ; म्हणजे आपले मन बाहेर जाणार नाही. मनाची बहिर्वृत्ती होऊ नये याकरितां हा उपदेश आहे. असे जे अधिकारी महात्मे असतील ते जनसमुदायात असतांनासुध्दा आपले मन अंतर्मुख करु शकतात.

द्रोणाचार्य सेनापति होते. शेवटचा दिवस होता. दुर्योधन काही त्यांना बोलल्यामुळे त्यांना वाईट वाटत होते. तो म्हणाला त्यांना "तुम्ही आमचे अन्न खाता आणि पांडवाकडे लक्ष देता. आमच्याकडे नाही". त्यांना राग आला आणि त्यांनी घनघोर संग्राम सुरु केला. सगळे पांडव घाबरले . त्यावेळी श्रीकृष्णांनी निराळी भूमिका घेतली. भीमाने कौरवांच्या सेनेतील अश्वत्थामा नांवाचा हत्ती मारला. अश्वत्थामा गेला या बातमीमुळे कौरवांच्या सैन्यात गोंधळ उडाला. अश्वत्थामा मुलगा मारला गेला ही गोष्ट द्रोणाचार्यांच्या कानावर गेली. लढाईचा त्यांचा आवेश कमी व्हावा याकरिता हा प्रयत्न केला. द्रोणाचार्य थांबले. अश्वत्थामा असा गेला इतका मोठा पराक्रमी. इतकी विद्या त्याला शिकवली. तरीही मारला गेला ! काय दैव आहे !"धर्मराजाला बोलवा म्हणाले. धर्मराजाला बोलावून खात्री करुन घ्यायची आहे की अश्वत्थामा जिवंत आहे की गेला". ही धर्मराजाची धर्मबुध्दि आहे त्यामुळे कौरवांच्या सेनापतीचा धर्मराजावर विश्वास आहे. हा बुध्दिभेद दुर्योधन करु शकत नाही. तुम्ही आमचे सेनापती आहात. असेल ! पण खरे बोलणारा धर्मराज !

श्रीकृष्णानी धर्मराजांना विचारले. "काय सांगणार तु आता " ते म्हणाले, "खर घडलं आहे तेच सांगणार." "लढाई कशाला सुरु केलीत म्हणाले. राज्य पाहिजे म्हणून युध्द चालू केलेत आणि याहीवेळी सत्यनिष्ठा चालणार नाही. थोडं पाप कर. राज्य पाहिजे तर थोडं पाप ओढवून घे असं काही त्यांनी सांगितले. सर्वांना ते माहित आहे. सैदिग्ध तो बोलला. राग आलेला आहे. रागाने, हजारो सैनिक मारताहेत. कोणी त्यांच्यापुढे जिवंत राहू शकत नाही. अशा स्थितीमध्ये हा प्रसंग आलेला आहे. धर्मराजानी सांगितले. तरी पुन्हा आपण एकाग्रचिंतन करुन सर्वांनाने, डंकणे वहून काय परिस्थिती आहे ती आपण स्वतः पाहू म्हणून ते आसन घालून डोळे मिटून तिथे बसले. आणि ध्यानाने अश्वत्थामा खरंच जिवंत आहे की नाही हे पाहण्याचा प्रयत्न करताहेत. इतक्यात त्या धृष्टद्युम्नाने पाहिले आणि त्याने उठून त्यांचा शिरच्छेद केला.

म्हणजे हे जे अधिकारी महात्मे आहेत, लोकव्यवहार कसाही जरी असला , चांगला किंवा वाईट किंवा आदेशाचा असला त्यांच्या मनावर काहीही नाही. वाटेल त्यावेळेला तंगलेल्या मनाच्या वृत्ती ते आवरू शकतात व आपली ह जी योगशक्ती तिचा उपयोग करून घेऊ शकतात. पण हे सर्वसाध्य नाही. म्हणून आचार्य महाराज सांगतात, "एकान्ते सुखमास्यताम्" परतरे चेतः समाधीयताम् एकान्तामध्ये आसन करून बसावे, आणि काय करायचं मग " तो जो परमात्मा आहे, एकमेव अद्वितीय दुसरे नाहीच कोणी त्याच्या शिवा, सगळे बाकीचे जड आहेत, केवल जीवांसुद्धा त्याचेच आहेत, फक्त निराळे भासताहेत, ते सुद्धा निराळे आहेत, सजातीय, विजातीय कोणीही नाही, अद्वितीय तो परमात्मा आहे, त्याच्याकडे चित्त ठेवा, त्याचे ध्यान करा म्हणतात. आता हे कसे शक्य आहे अद्वितीय परमात्म्याचे ध्यान करावयाचे म्हणजे द्वितीय जे आम्हाला दिसत आहे आमच्या मनामध्ये जे बसलेले आहे, संस्कारस्थानी, दारे खिडक्या बंद केली, सगळे केले तरी मनामध्ये सगळे पदार्थ आहेत, ते मनात येतातच ते द्वितीय गेल्याशिवाय अद्वितीय परमात्म्याचे ध्यान होणार नाही. तो फक्त महात्म्यांचा त्यांचा अधिकार आहे, अखंड चिंतन करून वासना, संस्कारसुद्धा मनातील ज्यांनी घालविलेले आहेत त्या महात्म्यांचा वासनाक्षय झालेला आहे, संस्कार सगळे संपलेले आहेत , काहीही नाही.

नरसोबाच्या वाडीला योगीस्वामी म्हणून एक प्रसिद्ध स्वामी होऊन गेले. त्यांना जवळजवळ आता 100 वर्षे व्हायला आली. ते असे योगयुक्त स्थितीमध्ये होते. महान गुरूंच्याबरोबर बोलणे, चालणे, केलेले. त्यांना दूध पाजणे वगैरे अशी कार्य चाललेली आहेत. आता ही मुले काहीतरी विचारीत. "काय स्वामीमहाराज तुम्ही काय वाचेत वाचून काही शिकलात का " ते म्हणायचे, "नाही रे मला काही येत नाही". "एक दोन तीन चार असे म्हणा" असे मुले त्यांना सांगायची. ते म्हणायला सुरवात केली. एक दोन तीन चार..... मऊ सहापर्यंत येऊन पुन्हा गेले अंतर्वृत्तीत. पुढे काही नाही. मग मुलांनी म्हणाव, "काय तुम्हाला अंकसुद्धा म्हणता येत नाहीत. काहीही नाही."

हा जो अभ्यास त्यांनी केलेला आहे, नामरूपाचे सगळे विरघळून गेलेले आहेत, संस्कार विरघळून गेलेले आहेत. एकांतामध्ये बसल्याबरोबर, सैलय झाल्यावर "परतरे चेतः समाधीयताम्" अद्वितीय आत्मस्वरूप त्यांच्या अंतःकरणामध्ये येत आहे, समाधी अवस्था प्राप्त झालेली आहे, अवस्था "मनातीत" झालेली आहे. आम्ही सगळे तीन अवस्थेमध्ये आहोत. चौथी अवस्था फक्त शब्दांनी माहिती आहे. त्या ठिकाणी काही वृत्ती असली पाहिजे. प्रत्यक्ष अनुभव घेणारे असे अल्प थोडे असतात.

"परतो चेतः समाधीयताम् ।" आपली अंतःकरण एकाग्र करून "पूर्णात्मा सुसमीक्ष्यताम् ।।" हा जो पूर्ण परमात्मा आहे त्याला पहा म्हणतात. त्याचे प्रत्यक्ष ज्ञान हे त्या अवस्थेमध्ये होत आहे. सर्व द्वैत वासना मनातल्या गेल्या. स्थिर झाले अंतःकरण, त्यावेळेला तो पूर्ण आत्मा कसा आहे अनन्यरूप आहे, प्रकाशमय आहे व स्वयंप्रकाशी ते पहा म्हणतात. आणि "जगदिदं तद्बाधितं दृश्यताम्" आत्मस्वरूप प्रकाशमान झाल्यानंतर नामरूपात्मक जगाचा कांही संबंध येत नाही.

समाधी अवस्थेमध्ये सदाशिव ब्रह्मेंद्रस्वामी नेहमी असायचे म्हणतात. पाचव्या सहाव्या भूमिकेवर होते. परंतु देहाचे भान नाही. असेच चालले असताना वाटेने जातांना मुसलमान सरदार लोकांच्या राहुट्या लागल्या आहेत. तिथे बायका आहेत. तो शिकारीला आलेला होता. वाटेत कोण आहे याची त्यांना कांहीही कल्पना नाही. शरीर चाललेलं आहे. बायकांच्या तंबूतून आत गेले आणि दुसऱ्या दरवाज्यातून बाहेर पडले. तो मुसलमान सरदार रागावला. म्हणाला, "काय म्हणावा हा साधू ! अंगावर वस्त्र नाही आणि आजूबाजूला बायका आहेत." त्याने तलवारीने त्यांचे दोन्ही हात तोडून टाकले. तरी तसेच पुढे निघाले. कांही देहभानच नाही. मग त्याच्या मनावर परिणाम झाला. तो त्यांच्या पाठीमागून चाललेला आहे. पुढे बरेच दूर गेल्यानंतर झाड मध्ये आले. तिथेच थांबले. आणि नंतर त्यांनी डोळे उघडले. हा सरदार पाया पडला. पुढे झाला, म्हणाला "क्षमा करा" "काय झालं" म्हणाले. "तरीही कांहीही कल्पना नाही. रक्त दोन्ही हातातून वाहत आहे. असे असे तुमचे दोन्ही हात तोडले" मग त्यांना आठवण झाली. दोन्हीकडे पाहिले आणि दोन्ही हात पुन्हा आलेले आहेत. म्हणजे त्याचाही कांही पर्वा नाही. मनात हे विकार उत्पन्न होणार नाहीत ; अशी अवस्था आहे. दोन्ही हात तोडलेले असतानासुध्दा राग नाही. कांही नाही. सगळे विकार दूर आहेत. आणि ज्यांचे मन निर्विकार झालेलं आहे असे महात्मे हे नामरूप विसरू शकतात. सगळं द्वैत गेलेलं आहे. एक आत्मस्वरूप आहे. त्यांत महाराजांनी सांगितलेले आहे. योगक्षेम "सद्गुरूकार्यं" सद्गुरूंनी सगळं सोडायचे. "अहम्" गेला. अहम् गेल्यानंतर ईश्वरही गेला, सद्गुरू गेले. सगळं गेलेलं आहे. फक्त आत्मानंद सच्चिदानंद आत्मस्वरूप तेवढं शिल्लक राहिलेलं आहे. ध्याता, ध्यान, ध्येय वगैरे कांहीही नाही. आत्मज्ञानाची भूमिका त्यांनी सांगितलेली आहे. वरिष्ठ शास्ता. शास्त्र काहीही त्याठिकाणी नाही. सगळं कर्तव्य संपलेलं आहे. ह्या ज्ञानभूमिकेचे हा अपेक्षा आहे.

"त्वं नो माता त्वं पिता" म्हणजे माता पिता आप्तेष्ट वगैरे सगळी प्रेमाची मंडळी सद्गुरूसुद्धा स्वतः आहे. आत्मस्वरूपाशिवाय दुसरं कांहीही नाही. ही अद्वैतदृष्टि त्या ज्ञानी पुरुषांजवळ असते. हा ज्ञानयोग आहे. आता व्यवहारात्मक विषय कसा विस्तरायचं असं मानायला काय हरकत आहे हरकत नाही. माना. या भूमिकेमध्ये शास्त्रप्रमाण आलेलं आहे. त्या शास्त्रप्रमाणांनी सांगितल्याप्रमाणे व्यवहाराकडे दृष्टि ठेवायची आणि वर्तन ठेवायचं यांत सगळं आलं. व्यवहारानं हे आम्हाला सगळं दिलं आहे. माता पिता हे सगळे आहेत. कांही हरकत नाही. आहेत असं माना. सर्वांनी मुलगा, मुलगी, बंधु, आप्तेष्ट काय असतील ती सर्वांनी मान्य आहेत. दिसत आहे. त्यांच्यावर प्रेम आहे. तेही आपल्यावर प्रेम करतात. हरकत नाही. पण त्यांच्या ठिकाणी दृष्टि ठेवतांना मात्र, वर्तन करतांना मात्र शास्त्रप्रमाणाचा विचार करायचा आहे. कर्म आणि उपासना ही जी ह्या दोन साधने आहेत या साधनांचा उपयोग या दृष्टिने होतो. या ठिकाणी कर्माची संगत, या ठिकाणी उपासनाही संपली. उपासकही नाही आणि उपास्यही नाही. योग समाधी अवस्थेमध्ये गेला. या अवस्थेमध्ये तो योग आत्मानंदामध्ये मग्न आहे. परिपूर्ण दृष्टि ज्ञान झाल्यानंतर पुढे कांहीही नाही. त्यावेळेस आता दुसरी दृष्टि आहे. व्यवहारामध्ये माता पिता हे सगळं त्यांनी मान्य केलेलं आहे. मातृदेवो भव, पितृदेवो भव, शास्त्रांत सांगितलेलं आहे. लहानपणापासून आणि पुढेसुद्धा मातापितरांचे स्मरण, आदरभाव हा शेवटपर्यंत राहिला पाहिजे. पितृदेवाबद्दल आदरभाव बाळगणारी कांही मंडळी आहेत. मातेबद्दल आदर असणारी मंडळी आहेत.

विलक्षण वागण्याचा अभ्यास हा व्यवहारातसुद्धा करावा लागतो. कुणीही घरी असला - विद्यार्थी घरी असला त्याचा श्रीमंताचा घरी "श्रीमंताचा मुलगा आहे" असं म्हणून चालत नाही. शिक्षक सांगतील त्याप्रमाणे ऐकून सदा अभ्यास करून केवळ विद्यार्थीभाव धारण करून रहावं लागतं. हा ही अभ्यास ठेवावा लागतो. मोठेपण विवाह होऊन गेल्यानंतर कन्या तिथेसुद्धा जी मंडळी असतील आपल्यापेक्षा त्यांच्याप्रमाणे आपलं मन तयार करावं लागतं. पाठीमागचं तसं विलक्षण वागावं लागत. परशुरामजी पित्याबद्दल त्यांच्या मनांत आदर भरपूर. बातमी म्हणा होती. त्यांची माता रेणुका. रेणु राजाची कन्या रेणुकादेवी पाणी आणायला गेली तिथे गंधर्वाची क्रीडा पाहली होती. तिथे पहात राहिली. परत यायला वेळ झाला. जमदग्नी आला. "आत येऊ नकोस म्हणाला". ज्ञान्यांनासुद्धा दोष होऊ नये अशी त्यांची इच्छा. पण आपल्या परिवारांत मनोदोषसुद्धा होऊ नये अशी त्यांची इच्छा. परशुरामजी आले बाहेर. "त्या तुझ्या मातेचा शिरच्छेद कर" म्हणाले. त्यांनी कांही विचारलं नाही. पित्याची आज्ञा आहे आणि पित्याचं तपःसामर्थ्य फार मोठं आहे. कांहीतरी कळ असतील. आज मारायला सांगताहेत. उद्या प्रसन्न झाले जमदग्न ऋषि मोक्षाचा राम हा ताकदीचं पाणी करी असतं तसं आहे. "उष्णता" हा कांही पाण्याचा गुणधर्म नाही. अग्नीच्या किंवा सूर्यकिरणांच्या

तंपकनि पाण्यामध्ये उष्णता निर्माण होते. मुकचा स्वभाव शैत्यंशु – शीत आहे तसे संत असतात. राग आला. तो राग गेला. "काय बाबा, तुझी काय इच्छा आहे  त्यांनी लगेच सांगितलं, त्यांचं तपःसामर्थ्य मोठं आहे हे त्यांना माहित होतं, तसा विश्वास होता. "माता जिवंत रहावी आणि मी तिला मारलं आहे याचं स्मरणही तीला राहू नये" असेच त्यांनी केलेलं आहे. कारण परशुरामची घरात राहणार आणि तिला "मला ह यांनी मारलं होतं व लगेच जिवंत केलं" अशी जर आठवण राहिली असती तर घरात राहता सुखे आलं असतं. रामचंद्रांनी कैकयीला जरी वनात धाडले तरी मातृदेवो भव हे कायम ठेवलं. पित्यावरही विश्वास ठेवलेला आहे. पित्याची प्रतिज्ञा पूर्ण करण्याकरिता. कैकयीची आज्ञा मान्य केली आहे. गेले वनामध्ये.

पण व्यवहार तसा सत्य आहे असं आम्हाला वाटतं आहे. त्यालासुद्धा कांही शास्त्रकारांची आडकाठी नाही. सत्य आहे हे तुम्ही समजा पण त्या ठिकाणी बुद्धि कमी आहे. [illegible] आदरणीय श्रद्धास्थानं कोणकोणती आहेत हे शास्त्रकारांनी सांगितलेलं आहे. शास्त्रप्रमाण मान्य करुन, ते ज्ञान संपादन करुन त्या त्या ठिकाणी बुद्धि ठेवा. देवीची पूजा
स्त्रिया देवीसमान मानाव
करणारे जे देवीचे उपासक आहेत. त्यांना तर सर्वही म्हणजे सद्गुरु किंवा श्रेष्ठ महात्मे आपल्या कृपेने दुसऱ्याच्या बुद्धि नको असतील त्या विचारांचे विस्मरणसुद्धा करु शकतात असे सांगितले आहे. असे मोठे मोठे उपासक आहेत. कुमारी असली तरी कुमारीलासुद्धा मोठे मोठे तंन्याली देवीची उपासकसुद्धा तिला नमस्कार करतात. म्हणजे श्रद्धास्थान हे कांही मानव्यात्मक विषय असेल तिकडं, पूर्ण श्रद्धा ठेवली पाहिजे . आत्मीयता. ममता पुढे ठेवली पाहिजे हे शास्त्राकडून सगळं समजून घ्यायचं आणि त्याप्रमाणे वर्तन मानून रहायचं. राहायला हरकत नाही. हे चितळ शकता नाही. स्वार्थीवृत्त्या आमच्याजवळ नाही. त्यांच्याकरिता माता ही मुख्य आहे. गुरुस्वरुप(ईश्वरस्वरुप) आहे ही भावना सांगितलेली आहे. हा दुसरा अर्थ आहे.

"पुंडलिकाचे भेटी परब्रह्म आले गा"

पांडुरंग आलेले आहेत, पुंडलिकाच्या भेटीला. "थांबा" म्हणाला, माझ्या देवाची पूजा करतो. पूजा संपल्यानंतर तुमच्या भेटीला येता. तुम्हाला थोडा वेळ असेल तर थांबा. थांबले थोडा वेळ ! काय करणार ! आता पांडुरंगाचे देव हे माता-पिता आहेत. व ते पांडुरंगानी मान्य केले आहे. त्यांनीच शास्त्र सांगितलेलं आहे. [illegible] त्यांचाच आदेश आहे. पुंडलीक त्या आदेशाचं पालन करतो आहे. यात पांडुरंगाचा अपमान झालेला नाही. शेवटपर्यंत मातृदेवो भव, पितृदेवो भव पांडुरंग येऊन उभे राहिले तरी सुद्धा त्या आदेशे पालन करताहेत. गव्हर्नरची किंवा मुख्यमंत्र्याची गाडी आली तरी त्या नियमाने हात दाखविला आहे. थांबली पाहिजे गाडी ! गव्हर्नर येवो. उलट तो आमचं सुख आहे. चांगला आहे. चांगले काम करणारा आहे. त्याला आमची …

होत नाही.

त्याप्रमाणे अनुसूया माता "अतिथिदेवो भव" प्रमाणे वागली. तसेच आम्ही पहातो. परंतु दृष्टि ठेवतांना त्यांनी जे सांगितलेलं आहे, अतिथी हाच देव आहे. अनुसूया मातेची मूर्ती साक्षीच आहे. आपली परीक्षा घेण्याकरिता त्रिमूर्ती आलेले आहेत. "ब्रम्हा-विष्णु-महेश" मध्यान्हकाळच्या वेळेला आलेले आहेत आणि भिक्षा संकल्प आहे. अतिथीची पूजा करायची, त्यांची इच्छा पूर्ण करायची, व्रत आहे. ईश्वरभावनेने त्यांचा सत्कार करायचा. त्यांनी सांगितलं , "वस्त्र काढून ठेवून आम्हाला भिक्षा घालत असाल तर आम्ही घेऊं". ही परीक्षाच आहे. अतिथी हा देव आहे हा अभ्यास चालू आहे. अतिथीच्या ठिकाणी देवदृष्टि आहे. ही अधर्माच्या वेळेला बदलायची काय अधर्म होतो आहे किंवा नाही हा प्रश्न आहे. प्रसंग आलेला आहे. ते तिथे आलेले आहेत अशा वेळी वस्त्ररहित व्हावं किंवा नाही हा अधर्म आहे हा दुसरा विचार आहे. परंतु तिची ही एक दृष्टि होती अभ्यासाने तिचा विचार पक्व झालेला होता. "अतिथी हा देव आहे" आता याचवेळा यांनी जरी असं सांगितलेलं असलं तरी ही थोडीशी चाली आलेली आहे. हे कदाचित परीक्षेकरिता असेल किंवा यांना कदाचित जीवदृष्टिनं हे काम म्हणजे अज्ञानी असतील म्हणून बोलले असतील. परंतु आपली दृष्टि कायम ठेवली पाहिजे म्हणून तिने आपला प्रसंग होऊं दिला नाही. सत्व जाऊं दिलं नाही. त्यामुळे परिणाम असा झाला की अज्ञानामध्ये, मोहामध्ये सापडणारे सगळे हे जीव वास्तविक ईश्वराचे अंश आहेत. परंतु ईश्वराची विभूती म्हणून असणारे अंश आहेत. विभूती हा भाग निराळा. ईश्वरशक्तीचा ज्या ठिकाणी विशेष आविर्भाव झालेला आहे त्यांना विभूती म्हणतात. "जनाच्या कल्याणा, संतांच्या विभूती" त्यांना विभूती म्हटले आहे. जीव जरी असले, ईश्वरांश सगळ्या जीवांत आहे तरी सगळे संसारी जीव विभूती होऊं शकत नाहीत. ते विभूतीरुप व्हायचे म्हणजे अशा प्रकारचं कांहीतरी आचरण केलं पाहिजे. तसंच देव जरी आहे. पण त्या ठिकाणी भाव ही भावना ठेवून - ही अनुसूयामाता जरी जीव होती तरी ईश्वरालासुध्दा तिने आपलं नियम्य बनविलं आहे. ईश्वर नियामक आहे. पण नियामक ईश्वरालासुध्दा आपला पुत्र केलं, म्हणजे आपण सांगू तसं ऐकायला लावलं, नियम्य बनविलं. हे सामर्थ्य जीवामध्ये सुध्दा निर्माण होत आहे जर सर्वनामरूपात्मक जग सत्य मानायचं झालं तर त्या ठिकाणी अशी दृष्टि ठेवली पाहिजे.

ममता हा दोष नाही. परंतु "संकुचित ममता" हा दोष आहे. आपला मुलगा, आपला नातु, आपले जावई, आपली कन्या, आपला मित्र वगैरे कांही विशिष्ट ठिकाणीच होतात. पण संतांची ममता म्हणजे सगळीकडे आहे. ते सर्व जनाकडे ईश्वररूप पाहतात. त्यामुळे "हे विश्वची माझे घर". माझे घर म्हणजे स्वतःचे लहान नाही. समग्र सारे घर आहे. सर्व ठिकाणी सारखीच ममता त्यांच्या मनांत उत्पन्न झाली. नामरूपात्मक ईश्वर खरा आहे हे माहित असूनसुद्धा त्या ममतेचा अभ्यास त्यांनी असा केला आहे की त्यामुळे सर्वत्र ममता आहे. सगळे माझेच आहे. नीलाताईंनी ताई दीक्षितांचे चरित्र लिहिले आहे. त्यांत एक गोष्ट दिली आहे. त्यांचा मुलगा मॅट्रिकमध्ये नापास झाला. पण दुसरा मुलगा पास झाला. तो पास झाला म्हणून ताईंनी पेढे वाटले. हे कठीण आहे. त्या ममतेचा उपयोग त्यांनी असा केला. त्यांना दुःख वाटले नाही. याचे कारण त्यांची मुले तर आहेतच ; पण दुसराही झाला तरी आपलाच मुलगा आहे.

"त्वं तो माता, त्वं पिता आप्तः" सर्व ठिकाणी आप्तबुद्धि आहे. सर्वही माझेच आहे न. दुर्योधनही आपलाच आहे. दुर्योधन पांडवांना आपले ऐश्वर्य दाखवुन त्यांना जास्त दुःख व्हावे असा प्रयत्न करण्याकरिता आलेला आहे. त्या द्वैतवनामध्ये ; सगळे बरोबर आहे. "स्त्रिया आहेत, सैन्य आहे आणि हे इंद्राला समजले म्हणून त्यांनी गंधर्वांना पाठविले, त्याला म्हणाले, युद्ध करून धरून घेऊन या" आणि सरोवरामध्ये चित्रसेन गंधर्व स्नान वगैरे करतो आहे इतक्यांत दुर्योधन आला. त्यांचे युद्ध झाले. दुर्योधनाचा पराभव केला. पकडले आणि नेले. आता काय करणार    दुर्योधनाला पकडून कैद करून नेल्यानंतर त्याचे दूत धर्मराजाकडे आले, "महाराज, असे असे झाले आहे. गंधर्वांनी त्याला कैद करून नेले " तो भीम म्हणाला, "बरे झाले". आमचे जे काम होते ते गंधर्वांनी परस्पर केले. जाऊ दे. पण धर्मराज म्हणाले, "बाबांनो असे बोलू नका. अगोदर तुम्ही जाऊन गंधर्वांकडून दुर्योधनाची सुटका करून द्या". अर्जुन गेला. गंधर्वांचा पराभव करून त्याला सोडवून आणले. म्हणजे दुर्योधनाला राज्य जरी मिळालेले असले, कपटानी का होईना - तरी पांडवांना जास्तीत जास्त दुःख देण्याची त्याची बुद्धि कायम राहिली. आपणच तेवढे सुखी झाले पाहिजे आणि बाकीचे कोणीही सुखी होता कामा नये ही जी बुद्धि आहे ती ममता आहे. हा तेवढा आमचा आहे. बाकीच्यांच्या सुखदुःखाची आम्हाला पर्वा नाही. नामरूपात्मक ईश्वर खरा मानीत असतांना सर्वही परमेश्वराचे अंश आहेत ही भावना उत्पन्न झाली पाहिजे. ही ममता अश आसक्ती दाखवत नाही. कर्तव्य करते. त्याच्याही उपयोगी पडले पाहिजे आणि जर अशी बुद्धि झाली नाही तर

अल्प गमतीचे आसक्तीमध्ये रूपांतर होतं, आणि त्यामुळे दुःख येते. संतमहात्म्यांच्या अंतःकरणामध्ये आसक्ती नाही. ते विमुक्तात्म झालेले आहेत, त्यामुळे त्यांना कुठेही गेलं तरी त्यांचं दुःख होत नाही. नामरूपात्मक शरीर असला तरी तो विनाशी आहे हे कोणालाही कबूल करायला पाहिजे. आम्ही मानून हे सर्व विसरून गेलेला आहे तो केव्हांही समाधी अवस्थेत राहू शकतो. त्यामुळे त्याला त्याचे संस्कार नाहीत, कांही नाही. तो केव्हांही पूर्ण आनंदामध्ये राहू शकतो. पण संपूर्ण विश्व दिसत असतानासुद्धां ज्या विश्वाबद्दल ममता होती, हे माझं आहे असं वाटत होतं, ते रूप सुंदर नामरूप हे सगळं विनाशी आहे हा सिद्धांत सर्वांनाच मान्य करावयाचा आहे. टिकणारं नाही. टिकणारं नाही म्हटल्यानंतर त्याचा काळ असेल तोपर्यंत राहील. कालमर्यादा समजायला आहे. ब्रह्मदेवापर्यंत कालमर्यादा आहे. तो सिद्धांत त्यांच्या दृष्टिपुढे असल्यामुळे त्याबद्दल कांही सुखदुःखाची भावना नाही.

असंप्रज्ञात समाधीमध्येसुद्धा पुष्कळ प्रकार आहेत. आम्ही सांगणाऱ्या भूमिका त्यांनी सांगितल्या आहेत. अगदी सातव्या शेवटच्या भूमिकेवर गेल्यावर मात्र मन थोडीही बाहेर येत नाही. अन्य, त्याच्यापूर्वी पांचव्या भूमिकेवर ज्ञान झालं, सहाव्या, सहाव्या भूमिकेपर्यंत ते ज्ञान पक्कं पक्कं होत राहील. तरी पुन्हा प्रारब्धाने मन पुन्हा बाहेर येत. बाह्य सुखदुःखांचा संबंध आलाच तर ते मन बाहेर येत. केव्हांही आत्मानंद आपल्याला मिळू शकणार नाही आहे. समाधीअवस्था त्यांना मिळालेली आहे. नामरूप विसरून गेलं म्हणजे झालं, परंतु नामरूपात्मक विश्वांत राहून अंतर्मन ठेवून त्याच्यापासून सुख उत्पन्न करावं आणि ती समाधान अवस्था कायम ठेवायची. संतांना त्रास देणारे पुष्कळ दुर्जन असतात. परंतु दुर्जनांनी त्रास दिला तरीसुद्धा "निंदकाचे घर असावे शेजारी" म्हणतात. हा सारा संतांचा विचार आहे. त्रास देणारा जो मनुष्य आहे : त्याच्याबद्दल दोन प्रकारच्या संकल्पना आहेत. द्रौपदीला अतिशय तसल्या बाजूनी त्रास झालेला आहे. कौरवांनी सभेमध्ये अपमान केला. अरण्यातात राहतांना कीचकाचा त्रास झाला. मारून भीमाने ही गोष्ट निराळी, पण तिला कष्ट सोसावे लागले म्हणून ती मध्ये मध्ये धर्मराजांना सांगायची. हे कपटी लोकं आहेत. त्यांच्याबरोबर कपटानेच वागलं पाहिजे. तसल्या रितीने तुम्ही त्यांच्याशी वागू लागलात तर तुमचा पराक्रम निश्चित आहे. हा एक सिद्धांत तिने सांगितला. ती दुःख भोगते आहे. संसारामध्ये असं वागल्याशिवाय जीवन व्यवस्थित होणार नाही. राजनीतिचाही तो भाग आहे. पण धर्मराजाला ते पटलं नाही.

सद्गुरु वासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराजांनी दुसरा एक सिद्धांत सांगितला आहे. आम्ही सहाचे जे आहेत त्यांचे हे विचार आहेत. "अपमान"

त्याची बरोबर अभ्यासाशिवाय होणार नाही. ज्ञानेश्वर महाराजांनी अमानित्वाची व्याख्या करताना मान म्हणजे काय आणि अपमान म्हणजे काय हे समजावून सांगितले आहे. माझी पूजा व्हावी असं वाटायला शिकावे. माझ्या गळ्यात माळ घातलेली. माझ्या बरोबर ~~असंख्य~~ चालताना वाटायला शिकाव हा मान आहे आणि तसे कधीही न वाटणे हे अमानित्व आहे. "स्वकीर्ति कानी न ऐकावी" म्हणतात. माझी कीर्ति, माझ्याबद्दल लोक काय चांगले बोलताहेत हे, असं ऐकायला शिकाव. अशी इच्छा म्हणजे "मान" आहे, पण नाही, कीर्ति स्मरणसुद्धा नसाव, आणि माझी आठवण लोकांना रहावी, काय लोकोत्तर पुरुष होऊन गेला असं लोकांना वाटाव यापेक्षा लोकांना माझी आठवणसुद्धा राहू नये हे अमानित्व आहे. महाराजांची ही भूमिका आहे. "माना"ची इच्छा निर्माण झाली कि योगमार्ग बंद होतो. त्यांच्या दृष्टीने अपमान स्थिती चांगली आहे. आता हा उपदेश समजणांना कसा पटणार ? ते सर्व वागतात तसं आपण वागायचं असं व्यवहारामध्ये चालत, ही वार्ता. संत महात्म्यांची अमानित्वाची भूमिका सर्वांना पटणार नाही.

पण धर्मराज जरी राज्य करणारा संसारी असला तरी त्याची वृत्ती धर्म प्रधान आहे, केवळ ऐहिक सुखाकडे त्याची आसक्ती नाही. आमच्याकडे विरक्त. जगातील सर्व सुखे सगळी मान्य आहे त्याला, पण ती सुखे स्वाद लेखी शिकवीत इतरांना मिळू नये अशी त्याची इच्छा नाही. केवळ आपला विचार आपण करावे अंतरात्म नसून सर्व विश्व अंतरात्म आहे अशी त्याची भूमिका आहे. सर्वच लोक हे विश्वाचे अंतरात्म्याचे रूप अशी त्याची भावना आहे. त्यामुळे धर्म त्याने की दुर्योधनाला गंधर्वांच्या तावडीतून सोडवून आणण्याची केली आज्ञा भीम, अर्जुनाला वाचवायची लागली. कारण त्याची धर्मपालनाची बुद्धि जरी होती. धर्माचरण मनापासून व प्रामाणिक होते, त्यामुळे जरी या भावंडांना धर्मराजाला अशा काही गोष्टींत अतिरेक विरोध असला तरी त्याच्या धार्मिकतेमुळे त्याची आज्ञा पाळावी लागत होती. ऐन प्रसंगी या भावामुळे आपले नुकसान झाले असे म्हणत असतील पण शेवटी त्यांना धर्मराजाच्या धर्माचरणाचे सामर्थ्य माहित होते, म्हणून त्या दोघांनी दुर्योधनाची सुटका करून आणली. धर्मराजासमोर मान खाली घालून उभा. असे वाईट वागू नकोस असा उपदेश करून धर्मराजाने त्याला पाठवून दिला.

या विचारामध्ये आपण राहतो त्याच्याकडे - अनुकूल, प्रतिकूलतेकडे - सारख्या भावांनी पहावे. मानाला अपमानाबरोबर स्वतःनेच सामना पाहिजे हे तो मार्ग सांगितला पण त्याच बरोबर धर्मात्म्याची दुसरी आज्ञा अशी आहे कि मानापमानामध्ये तटस्थ राहून आपण आपली हानि करून घेऊ नये. अपमान झाला तरी सुद्धा, हे मान्य करणारे महात्मे याप्रमाणे वागून विमुक्त होऊ शकतात आपण अपाय करून घेतात. धर्मराजाचे चरित्र व्यासांनासुद्धा लिहिण्याची इच्छा झाली

आहे, यावरून कर्माचे कर्म सामर्थ्य दिसून येते.

म्हणून महाराजांनी या दोन कृती या श्लोकात सांगितल्या आहेत. एक समाधि अथवा ध्यान करून ईश्वरात रमणे महत्त्वाचे, स्वरूपानुसंधानाचा अभ्यास करायला महाराजांनी सांगितला आहे. आपण आत्मस्वरूप काय आहे, मी अखंड आहे, माझा कोणाशीही संबंध नाही. ममता कुठली ? कोण माझा आहे ? त्याकरता दान सांगितले आहे. मम, मम म्हणून जो संबंध आलो आहे आपल्याला त्या वस्तूशी देहाशी आणि किंवा मानाचा हार रत्नांचा हार. दोघांची किंमत ममता आहे. ही जी प्रत्येक वस्तू बाबत मर्यादित ममता आहे हा मोठा दोष आहे. हा दूर करण्याकरता दान आहे. इदं न मम. दान म्हणजे योग्य माणसाला काय जोल ती वस्तू देणे. आपण त्या वस्तूवरचे स्वत्व सोडून दुसऱ्याचे स्वत्व निर्माण करायचे आहे. या करता दानकर्म आहे.

हा प्रकार झाला शास्त्रीय सिद्धांताचा शास्त्रीय दृष्टीने विचार करून. व्यवहारामध्ये वागताना, यज्ञ, दान, तप ही कर्मे करायची, ती केव्हा? सकाळी आपल्या वागून केवढी करायची. त्याच बरोबर उपासनाही आहे. नामस्मरणात्मक किंवा सगुण उपासना होते. प्रल्हादजी म्हणतात मी भजन करत नाही. करावे भजन करावे नाही ही विचाराची अवस्था आहे. प्रल्हादजी म्हणतात, माझ्या अंतर्यामी जो मुरारी बसली आहे तो माझ्या बुद्धिला भजन करण्याची प्रेरणा देतो. पण प्रल्हादजीची भूमिका हिरण्यकशिपूच्या लक्षात कशी येणार ? प्रल्हादजी दगडा वाचून भजन करताहेत हे बाहेरच्या दृष्टीला दिसतं, आणि आमची भूमिका अशी की आमच्या अंतःकरणे आमच्या बुद्धिला जे सुचते तेच कर्म आम्ही करतो. त्यामुळे त्याच्यापासून होणारे कर्म दिसत असताना दुसऱ्या आपण "मी करीत नाही" असं म्हणतो आणि विचाराची कल्पना, तो भर तत्त्वज्ञानी भगवत् पूर्ण संपन्न होता. त्यामुळे त्याच्या करून विचाराची अवस्था होत नव्हती. ही उपासना व्हावी पाहिजे आणि त्यात ईश्वराच्या कृपेने आनंद मिळतो आहे याची त्याला जाणीव आहे. पुढील विचाराची अवस्था सोडून प्रल्हाद भजन करतो असे नाही.

तर एकंदर शास्त्राने काय सांगायचं, का सांगायचं हे समजून घेतलं पाहिजे. किंवा ज्या शास्त्रांप्रमाणे वागणारे जे महात्मे आहेत त्यांची संगती सतत व्हावी पाहिजे. त्या संगतीने सगळे शास्त्रसिद्धांत आपल्याला कळून येतात. आपण या विचाराचे एक अंश आहोत. देहात राहूनच ओळखले पाहिजे आपल्याला. हे राहायचं म्हणजे काय तर एक जन्मच राहावे लागेल असे नाही. किती जन्म राहावे लागेल सांगता येत नाही. आचार्य महाराज म्हणतात एवढा आपल्याला पराकाष्ठेचे जे स्वरूप समजले कि आपल्या जीवनामध्ये कर्म संपले. सिंधुकाराच्या मताप्रमाणे केवढी सर्वांनी ही सांगितले आहे -

या निशां सर्व भूतानां तस्याम् जागर्ति संयमी
ज्ञानी आणि अज्ञानी. संसारी आणि महात्मा यांच्यात पृथक्करण करून दाखवले आहे. आनंद स्वरूप जो परमात्मा आहे त्याची काहीही कल्पना आम्हाला नाहीये , आजूबाजूला अंधार आहे. आत्मा कुठे आहे याचा काही पत्ताच नाही. देहा पर्यंतच आम्ही आहोत. देहाच्या पुढे जाऊ शकत नाही. तेव्हां ही आमची रात्र आहे. आत्मा हा रात्रीसारखा अरूप आहे. दिसत नाही. पण आम्ही जेव्हां निद्रा सुख घेतो आहोत त्यावेळी तो संयमी ज्ञानी महात्मा मात्र जागा आहे आणि तो आत्मानंदाचे सुख घेतो आहे. नामरूपात्मक विश्वात असणारे बद्ध जीव जेव्हां व्यवहारात जागे असतात तेव्हां त्या ज्ञानी महात्म्याची रात्र आहे. या जगाचे सर्वही व्यवहार त्या ज्ञानी महात्म्याच्या दृष्टीने रात्र. अंधार आहे बाकी काही नाही. मान नाही. अपमान नाही. सुख नाही. दुःख नाही. ईश्वरांत अखंड पोहोचलेल्या अशा महात्म्याची आपले सगळे लौकिक व्यवहार म्हणजे रात्र आहे याची आपल्याला कल्पना नाहीये.

म्हणून या नामरूपात्मक जगात आपण कसे राहावे. किती ममता ठेवावी. किती भर समजावी. आसक्ती किती ठेवावी. किती कमी करावी. ती कमी करण्यासाठी काय उपाय आहेत हे आपल्यासारख्या अज्ञानी जीवांना अशा ज्ञानी महात्म्यांच्या सत्संगतीने कळून येत. आणि आचरणाने या जीवनात कसे वागावे हे ठरवून अभ्यासांतर भोगवासनेच्या जगाचे काही विपरीत परिणाम आपल्या बुद्धिवर होऊ शकत नाहीत.

बाहेरचे विषय जरी सुटले तरी मनांत जे विषय घर करून राहिले आहेत ते जाणार कुठे ? डोळे मिटल्यावर बाहेरचे विषय दिसले बंद झाले पण आंत विषय आहेत त्याचे काय ? वासनात्मक विषय जमलेले आहेत ते आपली वृत्तीत्याने पुन्हा पुन्हा मनांत येणारच. जगाला सोडून जायच ठरवल. शत्रु नाही. मित्र नाही. सगळ्यांचा संबंध सोडून दिला तरी आणि वनामध्ये जायच ठरवल तरी मनामध्ये कामक्रोधादिक विकार भरात आहेतच ते कुठे जाणार वनात गेले तरी ?

म्हणून या ठिकाणी राहून नामरूपात्मक विश्वाकडे कसे पहावे हे या समजून घ्यावे संतांच्या संगतीत राहून. संतांच्या ग्रंथातूनही पुष्कळ मार्गदर्शन मिळू शकते. त्यामुळे चित्ताला समाधान मिळते. ज्ञानी महात्मा आपल्या पुण्याईने केव्हांही समाधि लावून बसू शकतो. आम्हाला ती समाधि लावता आली नाही तरी सुद्धा तरी या ठिकाणी राहूनसुद्धा या विचारांनी अंतरी भरलेले. असलेले. ते समाधान लाभू शकते. हे आपल्याला पांडवांच्या. रामचंद्रांच्या परिणामावरून दिसून येत. तेव्हां या विश्वात राहून ही ज्ञान दृष्टीने कर्म दृष्टीने उपासना कशी करावी हे सांगण्यासाठी महाराजांनी या सिद्धांत समजावला

आहे. तशी कुठे आपल्याला मिळावी ही या उत्सवाच्या निमित्ताने महाराजांच्याजवळ प्रार्थना करावयाची आहे.

आम्ही कधी त्या समाधि अवस्थेपर्यंत जाऊ शकत नाही आम्हाला ते अशक्य आहे. तेव्हां आपण पुस्तिकेमध्ये राहूनच नामस्मरण करणार, अष्टांग तगळ आम्हाला बर वाटत आहे. यातून आपला कसा उद्धार करुन घ्यावा या मार्गाने आम्हाला वाटचाल चालत राहता यावे आणि त्याप्रमाणे आचरण व्हावे आणि शेवटी समाधान प्राप्त व्हावे. शेवटीच या प्रसंगाच्या निमित्ताने सद्गुरु महाराजांच्या चरणी प्रार्थना करुन ही वाङ्मय सेवा त्यांच्या चरणी अर्पण करतो.

// अवधूत चिंतन श्री गुरुदेवदत्त //

गुरुपौर्णिमा १९८५
बोरिवली

परमेश्वरभक्ती त्यांच्या बुध्दिमध्ये, मनामध्ये निर्माण व्हावी असा ते प्रयत्न करीत आहेत विरुध्द वागणारे ईश्वराबद्दल ज्यांच्या मनामध्ये प्रेम नाही, धर्माबद्दल प्रेम नाही, दया, क्षमा वगैरे हे जे काही महत्वाचे गुण आहेत हे ज्यांच्याजवळ असायला नाहीत असेही आपली जीव जन्माला येतात, आणि दोष सगळे दूर करुन त्यांची बुध्दि ईश्वराकडे वळावी, शरीरामध्ये जे मन आहे ते मात्र आपली राक्षसी आहे, कठोर आहे, निर्दय आहे, अनेक दोष त्या मनामध्ये बुध्दिमध्ये असलेले असल्यामुळे लोकांना अत्यंत त्रास त्यांच्याकडून होतो आहे, म्हणून जे काही सात्विक देव वगैरे असतील, भगवद्भक्त जे असतील मानव त्यांनी ईश्वराची प्रार्थना केल्यानंतर अवतार परमात्मा घेऊन येतो.

महिषासुरमर्दिनी म्हणून जो अवतार झालेला आहे, महालक्ष्मी अवतार आहे, त्या महालक्ष्मी अवताराचे चरित्रही देवीमाहात्म्यामध्ये, मार्कंडेय महर्षिंनी सांगितलेल आहे, देवीमाहात्म्यामध्ये आणि देवी भागवतामध्ये शुंभनिशुंभांचे चरित्र, महिषासुराचे चरित्र हे सगळेही आलेल आहे, देवीची कृपा ज्यांच्यावर झाली ते संकटातून कसे मुक्त झाले हे त्यांनी पुढे मांडलेल आहे, ती कृपा ती भक्ती आपण करावी म्हणजे आपलही सगळं दुरित संपेल ही दृढ बुध्दि, अशी श्रध्दा असा विश्वास उत्पन्न होण्याकरता ही चरित्र आहेत.

ईश्वराची कृपा झाल्यानंतर बुध्दिमध्ये बदल होतो, मानवाला जीवाला जी बुध्दि प्राप्त होते त्याबद्दलचा एक सिध्दांत शास्त्रकारांनी सांगितलेला आहे "बुध्दि कर्मानुसारिणि" पापकर्म झाली तर तशी तामस बुध्दि रहाणार, पुण्य कर्म झाली तर चांगली पुण्यकर्माची वासना असणारी बुध्दि मिळणार, कर्माप्रमाणे बुध्दि, मन हे आपली त्या जीवाच्या बरोबर येत, म्हणून चांगली कर्म व्हावी आपल्या मनाने, वाणीने, शरीराने म्हणजे बुध्दि चांगली उत्पन्न होते, तर हा एक सिध्दांत जरी असला तरी दुसरी एक प्रकारची बुध्दि अशी आहे, भगवतगीतेमध्ये भगवान सांगतायत -

ददामि बुध्दियोगं तं येन मामुपयान्ति ते ।

जीवांना बुध्दि मी देतो म्हणाले, म्हणजे ईश्वराकडून मिळालेली बुध्दिही आहे जीवाकडे, त्यामुळे तो जीवात्मा परमेश्वराजवळ जाऊन पोहोचता, परमेश्वराचं दर्शन त्याला होत, ईश्वरदत्त बुध्दि आणि आपण केलेल्या कर्माप्रमाणे मिळणारी बुध्दि असे दोन प्रकार बुध्दिचे आहेत, कर्म चांगली करावी चांगली बुध्दि व्हावी त्या चांगल्या बुध्दिने पुन्हा चांगली कर्म करावी असा मार्ग ज्यांनी धरलेला आहे, त्यांची प्रगती ईश्वराच्या कृपेने होईल, कारण पापकर्म होणारच नाही त्यांच्या कडून.

पुण्यकर्म करण्याची बुध्दि आहे पुण्यकर्म होत रहाणार ती बुध्दि तशीच पुण्यकर्म करणारीच त्यांना मिळणार. कुशलात्मक बुध्दिमध्ये आहे.

म्हणून महिषासुरासारखे हे असुर उत्पन्न झाले त्यांची जन्मापासून तमोगुणी बुध्दि. आणि त्यामुळे सर्वांही जीवांना पिडा उत्पन्न झाली म्हणून जगदंबेचा अवतार झाला. सर्व देवांच्या शरीरातून तेज बाहेर पडून आणि ते सगळं एकत्र होऊन महालक्ष्मीचा अवतार झालेला आहे. म्हणजे महालक्ष्मी हे स्वरूप सर्व देवांचेच स्वरूप. देवांची सगळी शक्ती एकत्र होऊन महालक्ष्मी निर्माण झाली. आणि त्या महालक्ष्मीने महिषासुर आणि त्याच्या सहाय्याला असणारे, त्याच्या बरोबर रहाणारे सर्व दैत्य यांचा नाश केला आणि जगाला, सज्जनांना त्यांच्या संकटातून मुक्त केले.

म्हणून ही अशी बुध्दि असणारी माणसं त्याकाळात होती, तसेच आजही महिषासुरासारखे झाले असं नाहीये. चांगली माणसं, देव वगैरे होते. आपली सत्कर्म करणारे, सद्बुध्दि असणारे अशा प्रकारचे असल्यामुळे, त्यांचं संकट दूर करण्याकरता आपली जगदंबेचा अवतार झाला म्हणून सद्बुध्दि आपल्याला देवानी द्यावी. कर्माप्रमाणे सद्बुध्दि मिळते पण तशी कर्म घडली तर मिळेल. तशी सत्कर्म घडण्याकरता सज्जनांची संगती झाली पाहिजे. सज्जनांच्या संगतीमुळे मनावर परिणाम होऊन आपली ते जसे वागतात तसे वागण्याची इच्छा उत्पन्न होते आपली त्याप्रमाणे कर्मही घडून येतात. म्हणून देवानी बुध्दि द्यावी. देवापासून बुध्दि प्राप्त व्हावी अशी इच्छा धरून जे देवाची भक्ती करतात, उपासना करतात त्यांना देवही तशी बुध्दि देतात.

"बुध्दि दे रघुनायका"

समर्थांनी आपली रघुनायकाची प्रार्थना केली की मला चांगली बुध्दि दे. देवाने दिलेली बुध्दि त्या कर्माप्रमाणे मिळणाऱ्या बुध्दिपेक्षा वेगळी असते. ईश्वरात सत्य आहे ना ! ज्याला ही बुध्दि दिलेली आहे हा चांगला वागतो की नाही हे सगळं तो ईश्वर पहातो. ईश्वरापासून मिळालेल्या बुध्दिचे वागणं हे चांगलंच असणार. म्हणून ईश्वराच्या कृपेनं आपल्याला चांगली बुध्दि मिळावी. चांगलं मन आपसूच तयार व्हावं अशी प्रार्थना करणारे भगवद्भक्त हे ईश्वरकृपेने आपली सर्वांही समाजाचे कल्याण करतायेत, सामर्थ्य त्यांना असं ईश्वराकडून मिळालेलं.

सद्गुरु वासुदेवानंदसरस्वती स्वामीमहाराजांनी केलेल्या एका स्तोत्रात सद्बुध्दिमध्ये कोणते कोणते गुण असतात आणि ती बुध्दि देवानी द्यावी म्हणून देवाजवळ काय प्रार्थना करतात हे सांगितलं आहे -

धर्मे प्रितीम् ........धीरात्मकटाय् असद्वात्मान्यमतो ।

हे स्तोत्र प्रसिध्द आहे. शेवटचा श्लोक आहे. ज्या बुध्दिमध्ये यांचे गुण आहेत यांनी बुध्दि कोणाला म्हणायचं ती बुध्दि मागण्यापेक्षा हे गुण त्यांनी

मागितलेले आहे देवाकडे "धर्मे प्रितीम् देही" पहिली मागणी आहे. मनामध्ये धर्माबद्दल अत्यंत प्रेम, श्रद्धा, आदर पाहिजे. प्रेमाने धर्माचरण जर घडले तर त्याच फळ आपल्या पदरात पडत. करायचं, लोकांनी चांगलं म्हणावं म्हणून चांगलं वागायचं असं नाही. देवाची, ईश्वराची आज्ञा आहे आपण जर त्या आज्ञेचे पालन केलं, तसं जर आपण वागलो तर ईश्वराची कृपा आपल्यावर होईल. म्हणून अत्यंत प्रेमाने धर्माचरण झालं पाहिजे. म्हणून पहिली मागणी, पहिला गुण बुद्धिमध्ये हा पाहिजे, धर्मे प्रितिम् देही. नुसतं धर्माचरण घडू दे असं नाही. धर्माबद्दल माझ्या अंतःकरणामध्ये अत्यंत प्रेम, श्रद्धा, आदर निर्माण झाला पाहिजे हा गुण माझ्या बुद्धिमध्ये यावा.

ज्ञानेश्वर महाराजांनीही तसंच मागितलेलं आहे.

"जे खळांची व्यंकटी सांडो त्या सत्कर्मी रति वाढो ।"

सत्कर्म करताना अत्यंत प्रेम उत्पन्न झालं पाहिजे, आणि प्रेमानी सत्कर्म म्हणजे धर्माचरण झालं पाहिजे, चरी असत्कर्म झालं, समजा पाप घडलं, पण ते पाप चांगल्याकरता आहे, धर्म घडावा म्हणून पाप घडलं तर त्याचे फळ वेगळं आहे. कबिराचं उदाहरण सांगतात ना । कबिरांच्या घरी साधुसंत आले, यांच्या घरात काही नाही, धान्य नाही, काही नाही. त्या साधुसंतांना जेवायला घालायचं दुसऱ्या दिवशी आमंत्रण दिलं होतं. मग हे पिता-पुत्र रात्री दुकानात चोरी करण्याकरता गेले. तो मुलगा आत शिरला. धान्य किंवा काही ओढून दिलं त्याला. त्याने ते बापाकडे दिलं. कबीरांनी त्याचे गाठोडं बांधले आणि ते बाहेर यायला लागले. काही तरी वाजलं. तो मालक जागा झाला. कमाल त्याचं नाव. कमालने कबीराच्या मुलाचे पाय पकडले. आता हा बाहेर पडू शकत नाही त्याला जर कमालने ओढून घेतले तर तो त्याला ओळखणार. सगळीकडे सांगणार तो कबीराने चोरी केली. म्हणून त्याने पित्याला सांगितले माझे मस्तक कापून घेऊन जा. कबीरांनीही काही विचार केला नाही. मस्तक कापून घेतलं, घेऊन गेले घरी धान्याच गाठोडही घेऊन गेलेले आहेत. दुकानदाराने आत त्याला ओढलं, त्याला मस्तक नाही, कोण चोर मग त्या काळाच कुणावर दयाळा सांगितलं. कुणाचं व ह होतं. हे सगळेही संत महात्मे त्यांना जेवायला घातलं. मुलगा गेलेला आहे पण मनामध्ये आपली शोक लपवा आवरून ठेवून कर्तव्य कर्म केलं. अतिथी आपल्या घरी आलेले महात्मे. त्यांना जेवण घालायच आहे हा धर्म आहे. ईश्वराची आज्ञा आहे. "अतिथी देवो भव", तर हा धर्म आपल्या हातून घडावा म्हणून चोरी केली. स्वतःच्या पोटाला मिळावं म्हणून चोरी केली नाही हा एक विचार आहे. पण तोही धर्म चांगला घडावा. मध्ये काही विघ्न येऊ नये म्हणून मुलाच मस्तकही तोडून घेऊन गेले ही मनाची केवढी तयारी आहे । मुलगा सापडला असता तर ते सगळं धान्यही गेलं असतं, कबीरांनाही दुःखात जावं लागलं असतं.

तर धर्माचरण आपल्या हातून ईश्वरानी सांगितल्याप्रमाणे झाले पाहिजे ही आवड आहे. धर्माबद्दल प्रेम आहे त्या प्रेमामुळे आपली ही चोरीची पडली, मुलाचे मस्तकही तोडून, नंतर साधुसंतांच्या कृपेने तो मुलगा जिवंत झाला ही गोष्ट निराळी. तर हा गुण आपल्या बुध्दिमध्ये असेल तर ती बुध्दि चांगली आहे. ईश्वराच त्याच्याकडे लक्ष आहे. ईश्वरानी दिलेली बुध्दि कोणची म्हणायची तर ज्या बुध्दिमध्ये ज्या मनामध्ये धर्माचरणाकरता अत्यंत प्रेम वाटतय. आदराने धर्माचरण होतय ती बुध्दि देवानी दिलेली

परमेश्वरभक्ती त्यांच्या बुध्दिमध्ये, मनामध्ये निर्माण व्हावी असा ते प्रयत्न करीत आहेत विरुध्द वागणारे ईश्वराबद्दल ज्यांच्या मनामध्ये प्रेम नाही. धर्माबद्दल प्रेम नाही. दया, क्षमा वगैरे हे जे काही महत्वाचे गुण आहेत हे ज्यांच्याजवळ त्यायाला नाहीत अशी आपली जीव जन्माला येतात. आणि दोष सगळे दूर करून त्यांची बुध्दि ईश्वराकडे वळवी.

शरीरामध्ये जे मन आहे ते मात्र आपली राक्षसी आहे. कठोर आहे. निर्दय आहे. अनेक दोष त्या मनामध्ये बुध्दिमध्ये भरलेले असल्यामुळे लोकांना अत्यंत त्रास त्यांच्याकडून होतो आहे. म्हणून जे काही सात्विक देव वगैरे असतील, भगवद्भक्त जे असतील मानव त्यांनी ईश्वराची प्रार्थना केल्यानंतर अवतार परमात्मा घेऊन येतो.

महिषासुर मर्दिनी म्हणून जो अवतार झालेला आहे. महालक्ष्मी अवतार आहे. त्या महालक्ष्मी अवताराचे चरित्रही देवीमाहात्म्यामध्ये, मार्कंडेयऋषिंनी सांगितलेले आहे. देवीमाहात्म्यामध्ये देखील आणि देवी भागवतामध्ये शुंभनिशुंभांचे चरित्र, महिषासुराचे चरित्र हे सगळे देखील आलेले आहे. देवीची कृपा ज्यांच्याच झाली ते संकटातून कसे मुक्त झाले हे त्यांनी पुढे मांडलेले आहे. ती कृपा ही सर्वांनी आपण करावी म्हणजे आपणही सगळ दुरित जाईल ही दृढ बुध्दि, अशी श्रध्दा असा विश्वास उत्पन्न होण्याकरता ही चरित्र आहेत.

ईश्वराची कृपा झाल्यानंतर बुध्दिमध्ये बदल होतो. मानवाला जीवाला जी बुध्दि प्राप्त होती त्या बद्दलचा एक सिध्दांत शास्त्रकारांनी सांगितलेला आहे "बुध्दि कर्मानुसारिणि" पापकर्म झाली तर तशी तामस बुध्दि रहाणार. पुण्य कर्म झाली तर चांगली पुण्यकर्माची वासना असणारी बुध्दि मिळणार. कर्माप्रमाणे बुध्दि, मन हे आपली त्या जीवाच्या बरोबर येत म्हणून चांगली कर्म व्हावी आपल्या मनाने, वाणीने, शरीराने म्हणजे बुध्दि चांगली उत्पन्न होते. तर एक सिध्दांत वरी असला तरी दुसरी एक प्रकारची बुध्दि अशी आहे. भगवद्गीतेमध्ये भगवान सांगतायत.

ददामि बुध्दियोगं तं येन मामुपयान्ति ते ।

जीवांना बुध्दि मी देतो म्हणाले. म्हणजे ईश्वराकडून मिळालेली बुध्दिही आहे

जीवाकडे. त्यामुळे तो शिवाच्या परमेश्वराजवळ जाऊन पोहोचला. परमेश्वराचे दर्शन त्याला होते. ईश्वरदत्त बुद्धि आणि आपण केलेल्या कर्माप्रमाणे मिळणारी बुद्धि असे दोन प्रकार बुद्धिचे आहेत. कर्म चांगली करावी चांगली बुद्धि त्याची त्या चांगल्या बुद्धिने पुन्हा चांगली कर्म करावी असा मार्ग ज्यांनी धरलेला आहे, त्यांची प्रगती ईश्वराच्या कृपेने होईल. कारण पापकर्म होणारच नाही त्यांच्या कडून. पुण्यकर्म करण्याची बुद्धि आहे पुण्यकर्म होत रहाणार ती बुद्धि तशीच पुण्यकर्म करणारीच त्यांना मिळणार. कुकर्मात्मकाच बुद्धि मध्ये आहे.

म्हणून महिषासुरासारखे जे असुर उत्पन्न झाले, त्यांची जन्मापासून तमोगुणी बुद्धि आणि त्यामुळे सर्वही जीवांना पिडा उत्पन्न झाली म्हणून जगदंबेचा अवतार झाला. सर्व देवांच्या शरीरातून तेज बाहेर पडून आणि ते सगळे एकत्र होऊन महालक्ष्मीचा अवतार झालेला आहे. म्हणजे महालक्ष्मी हे स्वरूप सर्व देवांचेच स्वरूप. देवांची सगळी शक्ती एकत्र होऊन महालक्ष्मी निर्माण झाली. आणि त्या महालक्ष्मीने महिषासुर आणि त्याच्या सहाय्याला असणारे, त्याच्याबरोबर रहाणारे सर्व दैत्य यांचा नाश केला आणि जगाला, सज्जनांना त्याच्या संकटातून मुक्त केले.

म्हणून ही अशी बुद्धि असणारी माणसं त्यावेळेला होती. तसेच काही महिषासुरासारखे झाले असं नाहीये. चांगली माणसे, देव वगैरे होते. आपली सत्कर्म करणारे, सद्बुद्धि असणारे असा प्रकारचे असल्यामुळे त्यांचे संकट दूर करण्याकरता आपली जगदंबेचा अवतार झाला म्हणून सद्बुद्धि आपल्याला देवानी द्यावी. कर्माप्रमाणे सद्बुद्धि मिळते पण तशी कर्म घडली तर मिळेल. तशी सत्कर्म घडण्याकरता सज्जनांची संगती झाली पाहिजे. सज्जनांच्या संगतीमुळे मनावर परिणाम होऊन आपली ते जसे वागतात तसे वागण्याची इच्छा उत्पन्न होते आपली त्याप्रमाणे कर्मही घडून येतात. म्हणून देवानी बुद्धि द्यावी. देवापासून बुद्धि प्राप्त व्हावी अशी इच्छा धरून जे जे देवाची भक्ती करतात, उपासना करतात त्यांना देवही तशी बुद्धि देतात.

"बुद्धि दे रघुनायका"

समर्थांनी आपली रघुनायकाची प्रार्थना केली की मला चांगली बुद्धि दे. देवाने दिलेली बुद्धि त्या कर्माप्रमाणे मिळणाऱ्या बुद्धिपेक्षा वेगळी असते. ईश्वराचं लक्ष आहे ना. याला ही बुद्धि दिलेली आहे हा चांगला वागतो की नाही हे सगळं तो ईश्वर बघतो. ईश्वरापासून मिळालेल्या बुद्धिचे वागणं हे चांगलंच असणार. म्हणून ईश्वराच्या कृपेने आपल्याला चांगली बुद्धि मिळावी. चांगलं मन आपलं तयार व्हावं अशी प्रार्थना करणारे भगवद्भक्त हे ईश्वरकृपेने आपली सर्वही समाजाचे कल्याण करताहेत. सामर्थ्य त्यांना असं ईश्वराकडून मिळाले.

सद्गुरु वासुदेवानंदसरस्वतीस्वामी महाराजांनी केलेल्या एका स्तोत्रात सद्बुद्धिमध्ये कोणते कोणते गुण असतात आणि ती बुद्धि देवानी द्यावी म्हणुन देवाजवळ काय प्रार्थना करतात हे सांगितले आहे -

धर्मे प्रितीस् .........घोरात कष्टात उध्दरास्मान्नमतो ।

हे स्तोत्र प्रसिध्द आहे. शेवटचा श्लोक आहे. ज्या बुध्दिमध्ये चांगले गुण आहेत चांगली बुध्दि कोणाला म्हणायच ती बुध्दि मागण्यापेक्षा हे गुणच त्यांनी मागितलेले आहेत देवाजवळ. "धर्मे प्रितीस देही"पहिली मागणी आहे. मनामध्ये धर्माबद्दल अत्यंत प्रेम, श्रध्दा, आदर पाहिजे. प्रेमाने धर्माचरण जर घडल तर त्याच फळ आपल्या पदरात पडते. करायच, लोकांनी चांगल म्हणाव म्हणुन चांगल वागायच असे नाही. देवाची, ईश्वराची आज्ञा आहे. आपण जर त्या आज्ञेच पालन केल, सत जर आपण वागलो तर ईश्वराची कृपा आपल्यावर होईल. म्हणुन अत्यंत प्रेमानी धर्माचरण व्हाल पाहिजे म्हणुन पहिली मागणी. पहिला गुण बुध्दिमध्ये हा पाहिजे. धर्मे प्रितीस देही. नुसत धर्माचरण घडू दे असे नाही. धर्माबद्दल माझ्या अंतःकरणामध्ये अत्यंत प्रेम, श्रध्दा, आदर निर्माण झाला पाहिजे हा गुण माझ्या बुध्दिमध्ये द्यावा.

ज्ञानेश्वर महाराजांनीही तसच सांगितलेले आहे.

"जे खळांची व्यंकटी सांडो तयां सत्कर्मी रति वाढो।"

सत्कर्म करताना अत्यंत प्रेम उत्पन्न व्हाल पाहिजे, आणि प्रेमानी सत्कर्म म्हणजे धर्माचरण व्हाल पाहिजे. जरी असत्कर्म झाल, समजा पाप घडल, पण ते पाप चांगल्याकरता आहे. धर्म घडावा म्हणुन पाप घडल, तर त्याचे फळ वेगळ आहे. कबीरांच उदाहरण सांगतात ना. कबीरांच्या घरी साधुसंत आले. यांच्या घरात काही नाही, धान्य नाही, काही नाही. त्या साधुसंतांना जेवायला घालायच दुस-या दिवशी आमंत्रण दिल होत. मग हे पिता पुत्र रात्री दुकानामध्ये चोरी करण्याकरता गेले. तो मुलगा आत शिरला. धान्य बिन्य काही ओझ मिळाल त्याला. त्याने ते बापाकडे दिल. कबीरांनी त्याचे गाठोड बांधले आणि ते बाहेर घ्यायला लागले. काही सरी वाजल. तो मालक जागा झाला. कमाल त्याच नाव. कमालने कबीरांच्या मुलाचे पाय पकडले. आता हा बाहेर पडू शकत नाही. त्याला जर कमाल ने ओढून घेतले तर तो त्याला ओळखणार सगळीकडे सांगणार तो कबीराने चोरी केली म्हणुन त्याने पित्याला सांगितल. माझे मस्तक कापुन घेऊन जा. कबीरांनीही काही विचार केला नाही. मस्तक कापुन घेतल. घेऊन गेले घरी धान्याच गाठोडही घेऊन गेलेले आहेत. दुकानदाराने आत त्याला ओळख त्याला मस्तक नाही. कोण चोर ? मग त्या धडालाच चुकावर धरला सांगितले. उलटच घड होते. हे सगळेही संत महात्मे त्यांना जेवायला घातल. मुलगा गेला हे सगळेही/संत आहे. पण मनामध्ये आपली शोक सगळा आवरुन ठेवून कर्तव्य धर्म केले. अतिथी आपल्या घरी आलेले महात्मे. त्यांना जेवण द्यायच आहे हा धर्म

व्हावा म्हणून चोरी केली. स्वतःला पोटाला मिळावं म्हणून चोरी केली नाही हा एक विचार आहे. पण तोही धर्म चांगला व्हावा मध्ये काही विघ्न येऊ नये म्हणून गुलाब मस्तकही तोडून घेऊन गेले ही मनाची केवढी तयारी आहे ! मुलगा सापडला असता तर ते तसं धान्यही नेत असत. चोरांनाही दुर्गुणात चाव लागत असे.

तर धर्माचरण आपल्या हातून ईश्वराने सांगितल्याप्रमाणे झाल पाहिजे ही आवड आहे. धर्माबद्दल प्रेम आहे. त्या प्रेमामुळे आपली ही चोरीही पचली. गुलाब मस्तकही तोडलं. नंतर त्या साधुसंतांच्या कृपेने तो मुलगा जिवंत झाला ही गोष्ट निराळी. तर हा गुण आपल्या बुद्धिमध्ये असेल तर ती बुद्धि चांगली आहे. ईश्वराच त्याच्याकडे लक्ष आहे. ईश्वराने दिलेली बुद्धि कोणती म्हणायची ? तर ज्या बुद्धिमध्ये ज्या मनामध्ये धर्माचरणाकरता अत्यंत प्रेम वाटतय, आदराने धर्माचरण होतय ती बुद्धि देवाने दिलेली. "सन्मतिं देहि", "धर्मे प्रितीय देहि" हे पहिले मागणे आहे हा पहिला गुण आहे. धर्माबद्दल अत्यंत प्रेम अंतःकरणामध्ये उत्पन्न झाल पाहिजे तर ती देवाने दिलेली बुद्धि असे म्हणतात. ईश्वराची भक्ती माझ्या मनामध्ये असू दे. ईश्वराबद्दल प्रेम असू दे. धर्माबद्दलही प्रेम पाहिजे आणि ईश्वराबद्दलही प्रेम पाहिजे. ईश्वराबद्दल अंतःकरणामध्ये भक्ती प्रेम ज्यांच्या उत्पन्न झालेले आहे ते ईश्वराच्या कृपेने निर्भय राहू शकतात. म्हणून ईश्वरभक्तीची प्रार्थना मुद्दाम केली. ईश्वरभक्ती हा ही देवाने दिलेला गुण आहे. देवाने दिलेली बुद्धि कशी आहे ज्या बुद्धिमध्ये ईश्वराची भक्ती आहे. ईश्वराबद्दल प्रेम आहे. ही देवाने दिलेली बुद्धि. ईश्वराची भक्ती करणारे शुकाचार्यांसारखे ज्ञानी महात्मे ही आहेत ते ही ईश्वराची भक्ती करतात. मुमुक्षु जन, संसारा-बद्दल ज्यांच्या मनामध्ये वैराग्य उत्पन्न झालेले आहे. संसारात आता राहायच नाही. ईश्वराच दर्शन झाल पाहिजे अशी तळमळ ज्यांच्या अंतःकरणामध्ये उत्पन्न झाली असे मुमुक्षु ते ही ईश्वराची भक्ती करतात आणि संसारी लोक तर पुष्कळ आहेत तसे ईश्वराची भक्ती करतात. संसार हा सुखाचा व्हावा या उद्देशाने भक्ती करणारे आहेत की अर्थार्थी भक्त त्यांना म्हणतात. पण तोही चांगला आहे माझ्याकडे मागायला येतो ना. दुसरीकडे जात नाही त्याची निष्ठा चांगली आहे देव त्याला काही नाव ठेवत नाही. सारेच मागतो म्हणत नाहीत. तर असे हे सर्व प्रकारचे लोक संसारी आहेत. मुमुक्षु आहेत. मुक्त झालेले ज्ञानी महात्मे आहेत. देवाची भक्ती करतात त्यामुळे अंतःकरणामध्ये समाधान आहे. देवभक्ती ज्या मनामध्ये, बुद्धिमध्ये आहे ती देवाने दिलेली बुद्धि आहे हा एक गुण आहे. "संतसंगम्पिस देहि" सत्संगती आपल्याला मिळावी, ती करावी असे मनामध्ये वाटल पाहिजे. संत महात्मे काय सांगताहेत. त्यांचं मार्गदर्शन आपल्याला मिळाव हे ज्या बुद्धिला वाटत अशी बुद्धि ईश्वराने दिलेली बुद्धि

संतांनासंतांना मान देणं, संतांच्या बद्दल आदरार्थी प्रेम निर्माण होणं, धर्माबद्दल प्रेम पाहिजे, ईश्वराबद्दल प्रेम पाहिजे, संत महात्म्याबद्दल प्रेम पाहिजे, तर ती बुध्दि चांगली आहे. संतमहात्म्यांच्या बद्दल प्रेम केव्हा उत्पन्न होईल. मी मोठा आहे. माझी बुध्दि चांगली आहे. मला सगळा विचार करता येतो. माझ्या बुध्दिला सगळी कार्य मी करु शकतो असा अभिमान ज्याच्या मनामध्ये राहिलेला नाही ते संत महात्म्यांबद्दल प्रेम वाटत. नाहीतर ते ही आमच्याप्रमाणे ते ही मनुष्यच आहेत. आम्ही माणूस तेही माणूस त्यांच्याबद्दल इतका आपली प्रेम कशाला, आदरभाव कशाला पाहिजे असे बुध्दिला वाटून उपयोगी नाही. योग्य मार्गदर्शन करणाऱ्या बद्दलही अत्यंत प्रेम निर्माण झाल पाहिजे. ही बुध्दि आपली चांगली बुध्दि आहे. "संसंगच्छिम दे हि आणि भुक्तिंच मुक्तिम्" मुक्ती म्हणजे मोक्ष संसार. संसारही आम्हाला या म्हणतात. ही बुध्दि चांगलीच आहे. ईश्वराच्याजवळ आपली मागतो आहे. संसार या म्हणून. आणि ईश्वर संसार देतोच आहे.

संतांच्या मार्गदर्शनाप्रमाणे वागून चांगली कर्म जर केली तरी संसार हा सुखाचा होतो. परमार्थही सुखाचा होतो. पण ईश्वराचीच प्रार्थना तो करतो आहे कि "भुक्तिम् दे हि" विषयभोग म्हणजे संसार मला चांगला पाहिजे आहे. हे देवाजवळ मागणे ही सुध्दा चांगली बुध्दि म्हणतात. "आर्त, जिज्ञासु, अर्थार्थी ज्ञानींच भरतर्षभ" चार भक्त सांगितले भगवंतांनी. आर्त म्हणजे अगदी संकटात सापडलेला. जिज्ञासु आहे. काय आहे. सृष्टीकर्ता कोण आहे. हे कळाव अशी इच्छा आहे. तिसरा अर्थार्थी भक्त आहे. आपल्या संसारात हे कमी आहे मागायचं देवाला. मागायचे हे आम्हाला या. ते या. आणि चौथा ज्ञानी आहे. तर आर्त, जिज्ञासु आणि अर्थार्थी म्हणजे मागणारा देवाला याबद्दल सुध्दा भगवान सांगताहेत.

चतुर्विधा भजन्ते माम जनाः सुकृतेर्जुन

हे चौघेही भजन करणारे भक्त हे सुकृती म्हणजे पुण्यवान आहेत.

पुण्यकर्म झाल्याशिवाय आपली देवाकडे मागण्याची ईच्छा होत नाही. अहंकार आहे. संतांकडे, महात्म्यांकडे मागण्याची इच्छा होत नाही. अहंकारामध्येच त्यांची बुध्दि वाहून जाते. पण ईश्वराकडे सर्व समर्थ तो आहे. एवढी मोठी सृष्टी ज्याने निर्माण केली त्याच्याजवळ मागण्याची लाज कशाला पाहिजे. तो काय असमर्थ नाहीये. काहीही मागितल तरी देण्याच सामर्थ्य आहे ना!

संसारामध्ये जे जे कमी आहे ते देवाजवळ मागायच तुम्हीच. संसारी आहात तुमचा संसार आहे. हा संसार करताच्यामध्ये हा कमीपणा आहे. एवढ भरुन काढा. पूर्ण करा. अस देवाजवळ देवाला बोलायला मागायला काय हरकत आहे. कारण देवाजवळ शक्ति नाही अस नाही. कोणतीही शक्ती आहे. म्हणजे संसारामध्ये असलेली जी न्यूनता आहे ती न्यूनता भरुन काढण्याकरता ईश्वराची प्रार्थना करणे चांगल का आपल्याला आपल्या संसारातील [illegible]

हरण केले किंवा पाप कर्म करुन पैसा मिळवणे चांगले ? मुलगा गेलेला तर मिळणे शक्यच नाही. कितीही बुध्दि तुमची चांगली असो. सत्ता असो. सामर्थ्य तुमच्याजवळ पुष्कळ असो तरी हि गेलेला मुलगा कोणी परत आणु शकणार नाही. हे देवाजवळच मागायला पाहिजे. त्यांची सत्ता आहे. सांदिपनी गुरु महाराज त्यांचे गुरु होते तरी श्रीकृष्ण म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वर आहेत याची जाणीव त्यांना आहे. हा सामान्य मानव नाहीत हे मनामध्ये अत्यंत आपली योग्यता असल्यामुळे [illegible] त्यांनी मागितला आहे. देव काही असमर्थ नाही. मुलगा गेलेला आहे कसा आणु म्हणून काही देवांनी सांगितले नाही. आणून दिला लगेच. म्हणून संसाराबद्दलसुध्दा ईश्वराला मागायला हरकत नाही.

कर्माप्रमाणे संसारामध्ये सर्व सुख-दुःख प्राप्त होतात. ईश्वराचा तो नियम आहे. कायदा आहे. जसे कर्म केले त्याप्रमाणे सुख दुःख मिळणार आणि पण तो जो सृष्टिकर्ता आहे त्याला जर सांगितले. त्याच्या जवळ गा-हाणे मांडले तर तो कर्मा कर्माचा विचार करु शकतो. न्यायाधीश उत्तम बुध्दिमान आहे त्याला प्रार्थना केली तर अपराध्याचा दोष जरी असला तर तो बाजूला करुन त्याला निर्दोष तो सोडतो. त्याच्याजवळ बुध्दिमत्ता आहे तसं त्याच्या कर्मामध्ये कमीजास्त काय आहे हे पाहण्याचे काम सुध्दा ईश्वर करतो. कर्माप्रमाणे आपली मुला पण प्राप्त होईल अस सांगून ईश्वर काही निराश करत नाही आपल्या भक्ताला. म्हणून सुविचार देहि माया म्हणतात. पण तो मिळालेला जो संसार आहे ईश्वराच्या कृपेने संसार जर पूर्ण झाला तर त्याचा उपयोग सर्वांना सुध्दा होऊ शकतो अशी बुध्दिही त्याच्याबरोबर देत होतो ना ? सर्व प्रेम दिलेले आहे. ईश्वराबद्दलची भक्तीही आहे. साधु संतांच्याबद्दल अंतःकरणामध्ये प्रेम आदर आहे. हे सगळ ज्यांनी दिले त्यांनी संसार दिला पूर्ण संसार आहे सर्व संसार असताना त्याला अहंकार कसा होईल ? हे सगळे गुण ज्यांनी बुध्दिमध्ये दिले आणि शेवटी मुक्ती. मुक्ती म्हणजे सर्वही दुःखांचा कायमचा नाश होणे ही मुक्ती मागतात. सर्वही दुःख कायमची गेली पाहिजेत तात्कालीक.

नैसर्गिक आपत्ती आली. घर वाहून गेली. पाऊस कोसळला सगळ झाला तात्पुरत आपली आपण टिकण्यापुरती घरं बांधली सगळं झाल. पण अशी आपत्ती कधीही येऊ नये ही इच्छा मागितली. ही सगळी आधिदैविक दुःख आहेत. आधिभौतिक दुःख आहेत. अध्यात्मिक दुःख आहेत. बाजू असतात. सारखी दुःख एक ना दोन बाजू असतात. ही सगळीही दुःख संपून गेली पाहिजेत. त्याला मुक्ति म्हणतात. आणि ही स्थिती. सर्व दुःख कायमची जाय याला शरीराचा संबंध संपलेला आहे. जन्ममृत्यु संपले पाहिजेत. पुन्हा शरीराचा संबंध या जीवाला नाही. पूर्वीच्या कर्माप्रमाणे शरीर मिळालेल आहे. शरीर ज्याचच मागत म्हणजे

जन्माला यावच लागत. शरीराचा संबंध आल्याबरोबर आपली सुखदुःखाची संवेदना होऊ लागते. तेहि अपरिहार्य आहे. सर्व दुःख कायमची जायची याचा अर्थ शरीराचा संबंध कायमचा सुटला पाहिजे. पुन्हा शरीरामध्ये जीवात्मा नाही. शरीराशी कायमचा संबंध सुटणे हे ज्ञान्याशिवाय सर्व दुःखाची निवृत्ति म्हणजे मुक्ति ही प्राप्त होणार नाही. हे अत्यंत मोठ अशक्य कर्म आहे. किती काल लागेल याचा नेम नाही किती जन्म घ्यावे लागतील काहीही सांगता यायच नाही. असं मोठ आहे ते. मुक्ति मागण म्हणजे पण तेहि देवाजवळ मागायच. मुक्तिबद्दल. आपण मुक्त व्हाव अशी तळमळ मनामध्ये उत्पन्न झाली म्हणजे नमकी साधना करतात. काही अनुष्ठान करतात. ईश्वरकृपेने सर्व दुःखातून ही पूर्ण मुक्त होतात. ही मुक्तिची इच्छा म्हणजे सर्व दुःखातून आपण मोकळ झाल पाहिजे ही इच्छासुद्धा आपली मनामध्ये बुद्धिमध्ये असण ही सुद्धा ईश्वराची कृपा आहे.

शेवटी सांगायच "भावाधिक्यं" हा मोठा गुण आहे. भाव म्हणजे परमेश्वराबद्दल अत्यंत प्रेम. विशेष आपली मन आसक्त आहे. संसारातल्या आपली पदार्थांची आसक्ति सोडायची आपली ईश्वराबद्दलच्या प्रेमाची आसक्ति मिळवायची. ज्यांच्या अंतःकरणामध्ये ईश्वर प्रेम निरंतर राहिलेले आहे त्यांच मन हे संसाराकडे कधी जात नाही. सांसारिक अनुकूल प्रतिकूल घटना अनेक जरी घडत असल्या तेव्हा तरीसुद्धा अंतःकरणामध्ये ईश्वरप्रेमाची आसक्ति आहे. ईश्वर प्रेम अखंड राहाव यासाठी भक्त राहाव सर्वच धर्म ईश्वराची आहेत. जगदंबेचे रूप आहे ती जन्माला आहे. त्या मातृत्वाने आपली जगदंबेची भक्ती करण आणि अशा प्रकारचे जे आहेत देवीभक्त ते प्रेम त्यांच्या अंतःकरणामध्ये उत्पन्न झाल्यानंतर त्यांच दुसरीकडे लक्ष नाहीये. कर्माप्रमाणे जशी जशी सुख दुःख मिळायची असतील तशी मिळतात. जातात. ईश्वर प्रेमामध्ये जगदंबेच्या प्रेमामध्ये ज्याचे अंतःकरण स्थिर आहे त्यामुळे संसारातील कोणतेही आघात सहन करायचे धैर्य ज्याला म्हणतात ते धैर्य त्याला उत्पन्न होते. त्या प्रेमामुळे तर हे जे गुण आहेत.

धर्म प्रेम पाहिले. सन्मति म्हणून त्यामध्ये अनेक गुणांचा अंतर्भाव आहे. शांत बुद्धि राहण, सहनशील बुद्धि राहण, सर्व आपल्याप्रमाणे सर्वांचेही कल्याण व्हाव अशी बुद्धि राहण हे सगळे गुण सन्मतिमध्ये येतात. सवती देशभक्ती हा ही मोठा गुण आहे. संतांच्याबद्दल आदर बुद्धि उत्पन्न होण हा ही मोठा गुण आहे. त्यानंतर संसार मागतो आहे पण देवाजवळच संसार मागतो आहे. ईश्वरापासूनच आपल्याला संसार मिळावा. शंकराचार्य महाराजांच्या चरित्रामध्ये जगदंबेबद्दल किती प्रेम त्यांच्या अंतःकरणामध्ये होते. याबद्दल एक कथा आलेली आहे म्हणून एक गाव केरळ देशामध्ये आहे. त्या गावाचे नाव कालडी म्हणून आहे. त्या कालडी गावामध्ये शंकराचार्यांचा जन्म झाला. त्यांचे मातापिता दोघेही शिवभक्त. शंकराची उपासना करत होते. तपश्चर्या [illegible]

दोन-तीन वर्ष त्यांच्या सहवासात आली. तसेच विचार समज त्यांना जन्मतःच प्राप्त होत. ज्या कुटुंबामध्ये असे सगळेही ईश्वरदास गुरु आहेत आणि देवी संपत्ती घेऊन हे जन्माला आलेले आहेत. घराजवळच देवीचं एक मंदिर होतं त्या मंदिरामध्ये आमची आचार्य महाराजांचे पिताजी रोज पूजा करुन यायचे. आणि दूध आणून बालशंकराला द्यायचे. देवीचा प्रसाद घे म्हणायचे. दररोज त्यांना मिळत असे. एके दिवशी त्यांना आमची परगावी जायचे असल्यामुळे त्यांनी यांना सांगितले शंकरांना, बाळ शंकर, उद्या तू जाऊन देवीची पूजा करुन ये. हे सुंदर केव्हां केव्हां बाल होते मंदिरात. घरात ही आपले पिताजी पूजा कशी करतात हे पाहात होते. दुसरे दिवशी पिताजी गावाला गेले आमची बाळ शंकर आईनं तयारी ताटामध्ये सामुग्री पूजा सामुग्री दिली. फूल अक्षता हळदी कुंकु आहे धूप, दीप नैवेद्य सगळं आहे. ते आले घेऊन. जगदंबेला आमची स्नान घातलेले आहे. पुजलेले आहे. साक्षात जगदंबा या ठिकाणी आहे ही बुद्धि आहे. त्यामुळे प्रेम आहे. ही एक अचेतन मूर्ति आहे ही भावना नाही. जगदंबाच या ठिकाणी आहे. हळदी कुंकु वाहून फुलांची माळ घातली गळ्यामध्ये. निरांजन लावलेले आहे. धूप दीप झाला. नैवेद्याची आमची दुधाची वाटी पुढे ठेवलेली आहे आणि प्रार्थना केली. घ्या आईसाहेब, दूध घ्या. ही भावशक्ति आहे. आणि अत्यंत प्रेम आमची जगदंबेबद्दल अंतःकरणामध्ये प्रेम आहे प्रार्थना करताहेत. आता का होय दूध घेणार ? त्यांना तर वाटतय देवी आहे म्हणजे आई आहे म्हणजे. आणि मी इतकी प्रार्थना करतो आहे परंतु ही काही दूध घेईना. म्हणून रडायला लागले. काय बाल असेल. पिताजी पूजा करीत असतील त्यांना सगळं ज्ञान आहे. मंत्र तंत्र सगळं त्यांना माहिती आहे मला माहिती नाही. माझ्या हातून काय चूक झाली हे क्षमा करावी माताजी. माझी पूजा बरोबर झाली नाही म्हणून रागावून का होईल म्हणावे हे प्रेमाने आमची सांगतायत घ्या दूध.

अतिशय रडायला लागल्यानंतर जगदंबा प्रगट झालेली आहे. तो दूधाचा प्याला मातेने ओठाला. थोडं दूध पिऊन टाकलं अर्ध वाटी ठेवली. आचार्य महाराजांनी हे पाहिलं. आणि बालहीच रडायला सुरवात केली. जगन्माता म्हणाली, "बाळ, काय झालं ? तुझ्या इच्छेप्रमाणे मी दूध प्यायले आणि एवढेच काय ? शंकराचार्य महाराज म्हणताहेत बाल बुद्धि आहे. शुद्ध बुद्धि आहे. अंतःकरणामध्ये कोणत्याही प्रकारचा विकार नाही. ईश्वर साक्षात्कार झालेला आहे. प्रत्यक्षात झाल्यानंतर त्यांनी का पाणाव तर बालबुद्धिने वागाव म्हणून सांगताहेत अगदी निर्विकार अंतःकरण बालकांचं असतं तर आचार्य महाराज म्हणाले, "आईसाहेब, सगळं दूध तुम्हीच प्यायला असं रोज आमचे पिताजी तुमची पूजा करुन यायचे आणि घरी आल्यानंतर मला दूध द्यायचे हे आईचा प्रसाद आहे म्हणून सांगायचे मला आज वाटतय माझी आई किती दयाळू आहे. प्रेमळ आहे.

सगळं दूध पित नाही. मागच्याकरता थोडं दूध शिल्लक ठेवते. असं म्हणून मलासुद्धा अत्यंत प्रेम तुमच्या बद्दल वाटायचं. आज इतका वेळ मी एकलो आणखी तुम्ही सगळं दूध पिऊन टाकलंत. थोडसुद्धा शिल्लक ठेवलं नाही. शुद्ध बुद्धि आहे. भावसमन्वित आहे. देवीला दोष दिला नाही त्यांनी पण आई म्हणून आपली सांगितलेल आहे हे आईला वागणं शोभतं का. सगळं दूध...... रोज पाठवून देत होतात आणि आज सगळं कसं प्यायलात मग आपल्या स्तनातून त्या पात्रामध्ये दूध काढलं जगदंबेने आणि ते आचार्य महाराजांना प्यायला दिलं. आचार्य महाराजांनी स्तुति केली त्यावेळेला सौंदर्यलहरीमध्ये हा श्लोक आहे.

आई ! हे जे तुझे दूध आहे साधारण्या दूध नाही. तुझे हे पूर्ण ज्ञानरूप दूध मी प्यायलो त्यामुळे आज जगामध्ये मोठे मोठे जे कोणी ज्ञानी म्हणून समजले गेलेले लोक आहेत त्यांना सुद्धा मी मान्य ठरलेलो आहे. तो तुझ्या दुधाचा परिणाम आहे. 'भावातर्कितं वाक्सिद्धानन्दमूर्ती' जगदंबेच्या बद्दल अंतःकरणामध्ये अत्यंत प्रेम आहे. निस्सीम प्रेम आहे आणि ते अधिकाधिक वाढले पाहिजे याकरिता सगळी प्रार्थना. सेवा ही त्याकरताच आहे.

आचार्य महाराजांनी संन्यास जरी घेतला असला तरी अंतःकरणामध्ये ही जगन्मातेची भक्ती आहे. सर्व स्वरूप ईश्वराची जेवढी आहेत त्या प्रत्येक स्वरूपाबद्दल त्यांच्या चित्तामध्ये तितकच प्रेम आहे. गणेश आहे त्याचप्रमाणे आणखी विष्णू आहे शंकर आहे सूर्यनारायण आहे देवी आहे. सर्वांची स्तोत्र आणखी आचार्य महाराजांनी केलेली इतकी आणखी सरस स्तोत्र आहेत की, वाचता वाचता अंतःकरणामध्ये अत्यंत स्थिरता निर्माण होते. शांत अंतःकरण आहे. सर्व विकार निघून जातात. सगळीच ईश्वराची रूपं आहेत. तर जगन्मातेची भक्ती लहानपणापासूनच त्यांना होती. आणि त्या भक्तीच्या योगाने त्यांना ते दूध म्हणजे साक्षात ज्ञान सगळं मिळालेलं आहे. आणि त्यांनीही कबूल केले. माझी योग्यता नाही म्हणाले. जगन्मान्य मी झालो. सगळं जग माझ आणखी स्तुती करतंय त्याचं कारण हा तुझ्या दुधाचा प्रभाव आहे.

तर आपल्या मनामध्ये, बुध्दिमध्ये असे गुण मिळावे . कर्माप्रमाणे येणारी बुध्दिमध्ये चांगले गुण असतील असे नाही. चांगली कर्म घडलेली असतील तर चांगले गुण मनामध्ये, बुध्दिमध्ये उत्पन्न होतील. आणि त्या प्रमाणे पुन्हा पुढची चांगली कर्म घडतील. ईश्वराने अशी बुध्दि द्यावी म्हणून त्याच्याजवळ प्रार्थना केली पाहिजे.

धर्मे प्रीतिं सन्मतिं देवभक्तिं सत्संगाप्तिं
देहि भुक्तिं च मुक्तिं ।
भावासक्तिं चाखिलानन्दमूर्ते
घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते ।।

सगळेही गुण आमच्या बुध्दिमध्ये मनामध्ये असावेत अशी ही ईश्वराजवळ प्रार्थना करायची आहे भगवंताजवळ. म्हणजे तोच अशा प्रकारच्या बुध्दित्वाने आपल्या बुध्दिमध्ये आपली येऊन राहणार आहे. असे उत्तम गुण जर अंतःकरणामध्ये, बुध्दिमध्ये, मनामध्ये उत्पन्न झाले ईश्वराच्या कृपेने तर सर्वही संसार जो आहे तो अत्यंत कष्टाचा आहे त्या कष्टक्लेशापासून मानव मुक्त होईल. सर्वही दुःख जी कायमची आपली निघून जातात काहीही दुःख शेवट शिल्लक राहत नाही. तोच जन्म त्याचा शेवटचा ठरतो आहे. पुढचा जन्म नाही. पुढचं शरीर नाही. काही नाही. सर्व कर्म संपून जातायत. ही ईश्वराची कृपा ही होती आहे आपल्यावर.

वाकरता आई या रुपाने आपली ईश्वराची उपासना जर झाली जगदंबेची उपासना. तर त्यामध्ये आपली पूर्ण प्रेम आहे. मुलाच्या मनामध्येही बालकाच्या मनामध्येही आईबद्दल प्रेम आहेच. पण आईच्या मनामध्येही आपल्याबद्दल त्या बालकाबद्दल प्रेम आहे. म्हणून वाङ्मय, वाकीच्या स्वाधीन मातृत्वाने जगन्माता या रुपाने आपली भगवतीची उपासना ईश्वर उपासना ही करावी असे पुराण सांगितलेले आहे.

श्री चंडीविनायको

कलियुगामध्ये विनायकांची उपासना आलेली आहे. आणि चंडी भगवती जी आहे जगदंबा आहे त्या जगदंबेची उपासना आहे. आणि फलप्राप्ती त्याच्यापासून आहे. भारतवर्षामध्ये अशा प्रकारचे महात्म्ये पुष्कळ झालेले आहेत. मार्गदर्शन करणारे आहेत. अजूनसुध्दा दक्षिणेकडे, उत्तरेकडे देवीभक्ती जास्तीतजास्त आहे. शतचंडी, सहस्त्रचंडी वगैरे आपली मोठीमोठी अनुष्ठानं होत असतात. वेदमार्ग आणि तंत्रमार्ग दोन्ही मिळून आहे. केवळ तंत्रमार्गानेही आपली उपासना ही चालू आहे. वेदोक्त मार्गाप्रमाणे तंत्रमार्गाप्रमाणे मिळून सुध्दा ती उपासना चालू आहे. तर त्या उपासनेची पध्दती पुष्कळ विशाल आहेत. कशी देवीची भक्ती करायची ? काय करावच ? याचा विचार करणारी मंडळी पुष्कळ आहेत. आणि यथाविधी त्यांची पूजाअर्चा ही हे लोक करीत असतात. पण आचार्य महाराजांच्या

बुद्धिप्रमाणे बुद्धि ठेवून जरी पूजा झाली तर त्याच्या न्यूनाधिक्या विषयी देवी पहात नाही. माझ्या प्रेमाकडेच जास्ती लक्ष आहे. त्यामुळे काहीही जरी चुकी झाली काही चुका जरी झाल्या तथापि तिकडे काही लक्ष राहणार नाही. आई म्हणून आपण पूजा करणार मग आई तमके अपराध क्षमा केल्या शिवाय कशी राहील ? म्हणून भारतवर्षामध्ये सर्वांना उध्दाराचा मार्ग म्हणजे हा भक्तीमार्ग आहे. संतांनी हा मार्ग दाखविला आहे. स्वतः त्या प्रमाणे भक्तीमार्गाने गेलेले आहेत. आचरण केलेले आहे. भगवंताच्याबद्दल प्रेम अंतःकरणामध्ये जास्तीत जास्त वाढविण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला आहे. आणि सर्वांही लोकांच्यापुढे हा मार्ग कसा सरळ आहे हे समजावून दिले आहे. ईश्वर समर्थ आहे तेव्हा अशी ही भक्ती अंतःकरणामध्ये आपल्या वाढावी त्याकरता आपली प्रयत्न करायचा आहे. ईश्वराने अशी भक्ती आपल्या बुद्धिमध्ये ठेवावी. अशी बुद्धि देवापासून आपल्याला मिळावी ही प्रार्थना आहे.

देवी प्रकृतीचे हे मुख्य लक्षण आहे की ईश्वर भक्ती वरती पूर्ण विश्वास असणे. अनुकूल परिस्थितीमध्येही पाहिजे पण तो कदाचित कमी जास्ती होतो. पण प्रतिकूल परिस्थितीमध्ये मात्र निराश न होता ईश्वर भक्तीवर पूर्ण विश्वास ठेवून जर प्रार्थना अशाप्रकारची झाली तर त्या प्रार्थनेने कार्य होते. हा अनुभव म्हणा सांगण्याकरता म्हणून अशाप्रकारची पुराणे, मार्कंडेयासारख्या ऋषींनी लिहिलेली आहेत. निरनिराळ्या पुराणातून अशा प्रकारच्या कथा ज्या आलेल्या आहेत त्या दृष्टीने आलेल्या आहेत. मुख्य जे जीवात्मे आहेत जन्माला आलेले त्यांची बुद्धि सात्विक बनविण्याकरता. आयुष्य जेथपर्यंत जास्तीत जास्त प्रयत्न केला पाहिजे. बुद्धिची सुधारणा करण्याकरता मनुष्य जन्म आहे. पशुपक्ष्यांच्या जन्मामध्ये ती कल्पनाच नाहीये. मुक्तीचीही कल्पनाही त्यांना नाहीये. ही कल्पना फक्त आपली मनुष्याला मिळाल्या बुद्धिमध्ये आपली ही कल्पना येते. पण असेनात चांगले वाईट जरी आपली आपल्याला कळत तरी आपण चांगले आचरण करतो असं नाहीये. राजस,तामस संस्कार प्रकृति, ही प्रकृति आपली बदलली पाहिजे आपली आणि त्या करता प्रयत्न आपला झाला पाहिजे. त्या प्रयत्नामध्ये यश येण्याकरता म्हणून आपली जगन्मातेची प्रार्थना ही त्याच्याकरिता आहे. देवांनी प्रार्थना केली आपली ते कृतकृत्य झाले त्यांचे कार्य होऊन गेले आपली पुन्हा पूर्वीप्रमाणे त्यांना आपली त्यांचे त्रैलोक्य मिळाले. त्यांचे अधिकार मिळाले सर्व झालं. माँ सरस्वतीचे वर्णन करताना आपली जर मार्कंडेय ऋषींनी सांगितले आहे की माँ सरस्वतीची जर पूजा, आराधना उपासना जर झाली तर ही देवी ब्रम्हरूप परमात्म्याचे ज्ञान करून देणारी आहे.

पुण्यवान लोक जे आहेत त्या पुण्यवान लोकांना पाहिल्यानंतर मनाला समाधान वाटले पाहिजे. हा एक मनाचा. मनाला शांति समाधान मिळण्याचा हा एक उपाय योगसूत्रकारांनी सांगितला आहे. सुखी मनुष्याला पाहिल्या बरोबर त्याच्याबद्दल आनंद वाटला पाहिजे. मैत्री पुण्यवान लोक आहेत. पुण्य करणारे लोक आहेत. पुण्याची इच्छा सुद्धा होत नाही माणसाला. पण इच्छा उत्पन्न होऊन त्याप्रमाणे पुण्य कर्म घडावे अशी जगदीशाची प्रार्थना करून आणखी त्याप्रमाणे पुण्य कर्म पूर्ण करणारी मंडळी आहेत. त्यांना पाहून आणखी मुदिता. म्हणजे आनंद वाटला पाहिजे आपल्या मनाला हा एक अभ्यास आहे. "संस्कार" आपल्याकडून पुण्य होत नाही. ते पुण्य करतायत त्यांना पाहून आनंद वाटणे म्हणजे मन तयार होणे. मनाचा उत्कर्ष मुदितचा हा या ठिकाणी आहे. पापकर्म करणारे त्यांच्याबद्दल रागावण्याचाही अर्थ नाही. भ्रष्टाचार झाला. अमुक झाल तरी म्हणून रागावून काय करायच ? होणारच तो व्हायचच. त्याच्याबद्दल उपेक्षा करायची. सांगुन पहायच. नाही ऐकल नाही ऐकल. त्याच काय ? उपेक्षा जर त्याच्याबद्दल रागावून म्हणा प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला म्हणजे काय ? अशांति होणार. म्हणून पुण्य कर्म करणा-यांच्याबद्दल आनंद मुदिता वाटला पाहिजे. पापकर्म करणारे जे आहेत त्यांच्याबद्दल उपेक्षा वृत्तिचा अभ्यास करायला पाहिजे. सुखी जे लोक आहेत पूर्व पुण्य करून आलेले आणखी नव्या सुखामध्ये असलेले त्यांच्याशी मैत्रीने वागण्याचा प्रयत्न केला पाहिजे. हा आपल्या विषय आहे. दुर्योधनाला ते सहज साध्य झाल नाही. पांडव सुखी होते. स्वतःच्या पराक्रमाने आणि ईश्वरी कृपेने स्वतः बद्दल लोकांच्या मनामध्ये त्यांनी आदर बुध्दि निर्माण केली होती. त्याबद्दल याला आणखी मैत्रीनं राहिला असता दुर्योधन. किती छान असत वांगल. त्यालाच राजा कैसे असत. राजानं राजपुत्रांनी लगब्या भावांनाच मोठे पणा दिला. तुम्हीच हे करत जा. मी नामधारी राजा आहे म्हणाले. तुम्हीच खरे राजा आहात. असे हे कौशल्य आहे. तर तो तसा वागला नाही. सुखी मनुष्याला पाहिल्याबरोबर तो आपला विषय आहे. आपलाच आहे. हा जर अभ्यास झाला तर मन चांगल तयार होत. आपली नोकरी संपली बाबा. आता पगार मिळत नाही. पण मुलांना नोकरी लागल्या बरोबर आनंद होतो की नाही ? मुलगा म्हणजे काय हा आहे का स्वतः ? स्वतःची नोकरी गेलेली आहे. तरी आपल्या मुलाला नोकरी लागली आणि मुलाला पैसा मिळतो आहे याचा आनंद वाटतो की नाही आपल्याला. तसाच कोणीही जगामध्ये सुखी असलेला आपल्या पुण्य उत्कर्षांनी जर त्याला सुख मिळत असेल तर त्याला पाहून मैत्री उत्पन्न झाली पाहिजे.

आपल्याला मत्सर उत्पन्न होऊन उपयोग नाही. त्याच सुख घालविल पाहिजे ही इच्छा उत्पन्न झाली कौरवांना त्यामुळे सर्वनाश झाला. तर अशा प्रकारचे हे [illegible]

समाधानयुक्त अशार प्रकारचे करण्याकरता तसे तसे अभ्यास व्हायला पाहिजेत. आणि त्याचेसाठी जगदंबेची उपासना ही मुख्य आहे. कलियुगामध्ये "कली चंडी विनायकौ" हे सुधाम शास्त्रकारांनी सांगितलेले आहे. ही गणेशांची उपासना, जगदंबेची उपासना ही या ठिकाणी झालेली आहे. त्यानिमित्ताने आपली काही सेवा थोडीशी करण्याची इच्छा यांनी व्यक्त केल्यामुळे थोडे हे तीन/चार दिवस ही सेवा थोडी वाङ्‌मय सेवाही या ठिकाणी झालेली आहे. पुण्याहून सुधाम आपल यांनी बोलावलं म्हणून आलो. आम्हाला पहायला मिळाल हे. पुण्यकर्म कस असत. जगदंबेची कृपा असल्यानंतर ते कस पार पडत. अहंकाररहित अशारितीनं होऊन कस पुण्यकर्म केल पाहिजे, हे सगळी पाहून आपली आपल्याला शिक्षण मिळत ना ? पहाण हे सुद्धा एक शिक्षणच आहे. तर अशा दृष्टीने हे जगदंबेच्या कृपेने आपली तिची कृपा या स्थाने पहायला मिळाली हे ही मोठ मनाला समाधान आहे. अशारितीने हे सर्वही केवळ यजमान, पुण्यकर्म करणारच त्यालाच पुष्कळ सर्वांनी त्यांचच कल्याण होईल. कृत, कारित आणि अनुमोदित कर्मांमध्ये तीन प्रकार सांगितले. पुण्यामध्ये स्वतः पुण्य करणं, दुस-याकडून करविन हे ही पुण्यच आहे. दुसरा करतोय कुणी, तुम्ही चांगल केल अस मुखात अनुमोदन झाल हे सुद्धा पुण्य आहे. कशाला हलका पैसा खर्च केला ? काय गरज होती. संसारात काही हे लागत नाही काय ? किती महागाई आहे. बुद्धिभेद करण्याचा प्रयत्न करायचा. देणारी समर्थ आहे जगदंबा, ती देणारी आहे, ती सगळ करुन घेते. तर ही जी स्थिती आहे अंतःकरणाची उगीच काही तरी मनामध्ये दुर्विचार उत्पन्न होतात. ते सगळे विचार नाहिसे होण्याकरता ईश्वराची आपली भक्ती आम्हाला मिळावी म्हणून संतांनी भक्तीमार्गाचा पुरस्कार केला आहे. सर्वही संत या भक्तीमार्गातच येतात.

किंबहुना सर्व सुखी पूर्ण होऊनी तीन्ही लोकी
भजिजो आदी पुरुषी अखंडीत

ज्ञानेश्वर महाराज शेवटी सांगतायत. सर्वही सुख मिळू दे लोकांना. आम्हाला सुख मिळू नये असे म्हणत नाही. त्यांनी संसार केला नाही तरी आम्हाला संसार करु नका असं काही ते सांगत नाही. परंतु हे सगळ मिळालेले असताना सुद्धा तो जो जगत्कर्ता आहे सृष्टी ज्यांनी निर्माण केलेली आहे त्याला विसरु नका एवढेच त्यांचे सांगणे आहे हे लक्षात ठेवायच आहे. आपल्या मनाची शुद्धि, मनाच आपली संशोधन करुन, चांगली बुद्धि बनविण्याकरिता मनुष्य जन्म आयुष्य शेवटपर्यंत प्रयत्न केला पाहिजे. ती चांगली बुद्धि बनविण्याकरता ईश्वराचे भजन आहे. जे काही असे ईश्वरभक्त असतील त्यांची संगती आहे त्यांचं आचरण पाहून त्यां आचरणाप्रमाणे त्यांच्या सांगण्याप्रमाणे आचरण करणे ही सगळी साधना आपल्या भारतामध्ये सगळी सांगितलेली आहे. आचावार हा भारतातच फक्त आहे ही अतिशयोक्ती नाहीये किंवा हा अहंकार ही नाहीये निराशावाद हा हलकर पसरलेला आहे. पाश्चात्य देशांमध्ये आत्महत्येच प्रमाण किती आहे आणि

ईकडे किती आहे या एकाच गोष्टीवरून हे दिसून येते. आमच्या धर्मामध्ये निराशा नाहिये. कशीही परिस्थिती आली तरीसुद्धा काही मार्ग सांगितलेला आहे. कारण जिवात्मा आमच्यामध्ये देह म्हणजे आत्मा नाहीच. देहापेक्षा मी निराळा आहे ही बुद्धि पहिल्यापासून भगवंतांनी अर्जुनाला शिकविली. हा देह नाशवंत म्हणाले. देहाची सुट झाली क्षय आणि हा देह गेला तरी दुसरा देह मिळणार आहे. माझ्या बुद्धिने मी माझा उत्कर्ष करून घेण्याला समर्थ आहे. हा आशावाद भारतामध्ये आपणही दाखविलेला आहे. ऋषीमुनींनी, प्राचीन शास्त्रज्ञांनी त्याप्रमाणे आचरणही लोकांनी करून आपला उत्कर्ष करून घेतलेला आहे.